
पंढरीची वारी

७०० किलोमीटरचा पायी प्रवास करत शेगावीचे राणा सोलापूर मुक्कामी

- भाविकांकडून उत्साहात स्वागत; दर्शनासाठी दिवसभर रांगा
- आ.प्रणिती शिंदे-मनपा आयुक्तांच्या फुगडीने वेधले लक्ष

लवकर पाऊस येऊ दे : आ. शिंदेंनी घातले साकडे

सर्व सोयीसुविधा उपलब्ध केल्या आहेत: आयुक्त

महाआरोग्य शिबिरासाठी प्रत्येकानेच सेवाभाव

पंढरीची वारी । पान ८ विशेष

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि. २३ जून २०२३ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : २६४ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

# ४० कोटी द्या कारखाना सुरू करून दाखवू

**संजय थोबडे यांचे काडादी यांना खुले आव्हान**

✔ सुराज्य/सोलापूर

**को-जनरेशनची चिमणी पाडल्याने सिद्धेश्वर साखर कारखान्याचा गळीत हंगाम दोन वर्ष सुरू होणार नाही, हे धर्मराज काडादी यांचे म्हणणे दिशाभूल करणारे चुकीचे आहे. काडादींनी ४० कोटी रुपये ३० जूनपर्यंत द्यावेत, गळीत हंगामच काय, सहवीज निर्मिती करुन कारखानाही चालू करून दाखवू, असे थेट खुले आव्हान सोलापूर विकास मंचचे सदस्य संजय थोबडे यांनी दिले आहे. चिमणी पडल्यामुळे १५०० कोटी रुपये नुकसान झाल्याचे काडादी म्हणतात, पण प्रत्यक्षात ५०० कोटी मध्ये सिद्धेश्वर इतक्याच कॅपॅसिटीचा नवीन कारखाना उभा राहू शकतो, असेही ते म्हणाले.**

## काडादींची कार्यपद्धती हेकट आणि मनमानी असल्याचा घणाघात



संजय थोबडे पुढे म्हणाले की काडादी यांची कार्यपद्धती हेकट, मनमानी आहे. त्यांच्या प्रत्येक उद्योग व्यवसायात चुकीचे निर्णय घेतल्याने संस्थांना मोठे दंड किंवा तोटे झाले आहेत. सिध्देश्वर कारखान्याच्या विस्तारीकरणात ३५० कोटी रुपये घालवले. ही सारी मशिनरी बंद स्थितीत आहे. ३०० कोटींची साखर शिल्लक ठेवून त्यावर व्याज भरावे लागले. यात २०० कोटी रुपये नुकसान झाले. कारखान्याला हजार कोटी रुपये देणे बाकी आहे, असे व्यवहार शून्य सर्व काही असताना ते सिध्देश्वर कारखाना आदर्श पद्धतीने चालवत होते, असा दावा कसा करतात? असा प्रश्न थोबडे यांनी केला. शेतकऱ्यांचे गेल्या हंगामातील पैसे मिळालेले नाहीत. कामगारांचे ६ महिने झाले पगार नाहीत. कामगार न्यायालयात ९८ खटले कामगारांनी दाखल केले आहेत. कारखाना बंदच्या दिशेने जात असताना आता कोणावर तरी खापर फोडायचं म्हणून धर्मराज काडादी भाजपाच्या आणि लोकप्रतिनिधींच्या नावाने खापर फोडत आहेत. वास्तविक पाहता यात भाजपचा काहीही संबंध नाही. आ. विजयकुमार देशमुख आणि आमदार सुभाष देशमुख यांनी चिमणी पाडकामाबद्दल एक शब्दही बोलला नाही याचे आपण साक्षीदार आहोत, असे थोबडे म्हणाले.

लिंगायत समाजाचे कोणीही, कुठलेही नुकसान झालेले नाही आणि होणार नाही. समाजाचे नुकसान झाल्याचा केवळ बाऊ केला जात आहे. काडादींच्या भ्रष्ट कार्यपद्धती विरोधात आपण आवाज उठवला. मी सुद्धा लिंगायत आहे, इतर समाजाला दोष देण्याचे कारण नाही. चिमणी पाडल्याने कोणताही लिंगायत समाज नाराज झालेला नाही. त्यांचे समर्थक हे सहानुभूती दाखवण्यासाठी असे बोलत आहेत, असेही थोबडे म्हणाले. आम्हाला शेतकऱ्यांचे चिंता आहे त्यामुळे कारखाना चालू करावा, यासाठी आमचाही प्रयत्न आहे. आम्हाला चाळीस कोटी रुपये दिल्यास आम्ही कारखाना व्यवस्थितपणे चालू असेही शेवटी संजय थोबडे ठासून म्हणाले.

### निवडणूक लढवणार नाहीत पण कारस्थान करतील

काडादी हे गळीत हंगाम सुरू करतील. कारखाना सोडू शकत नाहीत. केवळ सहानुभूती मिळवण्यासाठी त्यांचे हे नाटक आहे. ते कोणतीही निवडणूक लढवणार नाहीत, मात्र राजकीय कारस्थान करतील असेही संजय थोबडे म्हणाले.

### राजकीय नेते गरम तव्यावर पोळी भाजत आहेत

बेकायदा चिमणी पाडल्याने तवा गरम दिसला म्हणून पोळी भाजण्यासाठी आ. प्रणिती शिंदे, माजी आ. दिलीप माने, नरसय्या आडम, माजी महापौर महेश कोठे यांच्यासह दोन्ही काँग्रेसचे पुढारी पुढे आले आहेत. त्यांना ना समाजाची ना कारखाना आणि सभासदांची परवा आहे. या लोकांना आगामी निवडणुकीत भाजप विरोधात लढायचे आहे.त्यामुळे हे सर्वजण भाजपच्या विरोधात बोलत आहेत, अशी तोफही संजय थोबडे यांनी डागली आहे.

### उमेदवारी दिली तर लढू...

आगामी निवडणुकीत आपल्याला भाजपाने उमेदवारी दिल्यास आपण निवडणूक लढवायला तयार आहोत. अगदी शहर मध्य मध्ये प्रणितींच्याविरुद्धही आपण निवडणूक लढू किंवा कडादी जिथे उभारतील तेथे भाजपकडून लढण्यास सज्ज आहोत, असेही संजय थोबडे म्हणाले.



## फय्याज पठाण आत्महत्या; स्वामी दाम्पत्यावर गुन्हा

✔ सुराज्य/बार्शी

गर्भलिंग निदान चाचणी करून गर्भपातही करणाऱ्या बार्शी शहरातील दत्तनगर येथे वास्तव्य असणाऱ्या नंदकुमार स्वामी व त्याची पत्नी अर्चना स्वामी व मुलगा यश स्वामी यांच्यासह भूमचे सुरेश कांबळे व अन्य चार जणांवर फय्याज पठाण या इसमास आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी भूम शहर पोलीस ठाण्यात भा.दं. वि. कलम ३०६, ५०४, ५०६ अधिक कलमाअन्वये गुन्हा दाखल झाला आहे.



दरम्यान या प्रकरणात आत्महत्या केलेल्या फय्याज पठाण या स्वामी याच्या फिरत्या गर्भलिंग निदान चाचणी व गर्भपात केंद्राच्या वाहनाचा चालक असल्याची माहिती मिळाली आहे. पठाण याने आत्महत्या करण्यापूर्वी दि. २० जून रोजी पठाण याने जारी केलेल्या व्हिडिओमध्ये स्वामी याच्या कृष्णकृत्यांचा पाढा वाचला आहे. या व्हिडिओमध्ये पठाण याने स्वामी हा भूमच्या सुरेश कांबळे मार्फत जिवे मारण्याची धमकी देऊन मारहाण करून ३१ लाख रुपये मागत असल्याचे म्हटले आहे. हे पैसे देता येत नसतील तर माझ्याबरोबर काम कर, असा स्वामीचा दबाव होता, असे या व्हिडिओमध्ये पठाणने म्हटले आहे. या व्हिडिओत स्वामीने राज्यातल्या विविध भागात केलेल्या गर्भलिंग निदान चाचण्या व गर्भपाताच्या अनेक कृत्यांचा उल्लेख आहे. स्वामी याने या बेकायदेशीर व्यवसायातून अनेक जणांच्या नावावर बेनामी मालमत्ता केल्याचेही या व्हिडिओत म्हटले आहे. तसेच या व्हिडिओत पठाण याने स्वामीने बीड जिल्ह्यात केलेल्या गैरकृत्यांनाही वाचा फोडली आहे. पठाण याने आपल्या कथनामध्ये भूमच्या पोलीस स्टेशनसमोर मारहाण झाल्याचा तसेच सततच्या धमक्या व मानसिक छळवादाला कंटाळून आपण आत्महत्या करणार असल्याचे, जाहीरपणे सांगितले आहे. तसेच भूमच्या सुरेश कांबळे व स्वामी दाम्पत्य आणि त्यांच्या मुलावर गुन्हा दाखल झाल्याशिवाय आपले शव ताब्यात घेऊ नये, असे म्हटले आहे.

### २० वर्षांपासून अनेक गैरप्रकार केले

याप्रकरणातील संशयित आरोपी असलेल्या स्वामीने गर्भचाचणी व स्त्रीभ्रुण हत्येचे अनेक गैरप्रकार गेली २० वर्षाहून अधिक काळ केल्याची माहिती मिळाली आहे. बीड येथे घडलेल्या अशाच एका पिडीत महिलेच्या जबरदस्तीने केलेल्या गर्भपातानंतर स्वामीवर गुन्हा दाखल झाला होता. याप्रकरणात तो जामिनावर सुटला होता. मात्र 'मुलगी नको मुलगा हवा' या पुरुषी मानसिकतेने पछाडलेल्या हजारो कुटुंबांच्या मनोवृत्तीचा गैरफायदा घेत लाखो रुपयांची कमाई मिळत असल्याने स्वामीचा हव्यास वाढला होता. त्यामुळे स्वामीने हा व्यवसाय बंद केला नाही.

### निसर्गोपचार केंद्राच्या नावाखाली धंदा

बार्शी शहरातही त्याने निसर्गोपचार केंद्राच्या नावाखाली हाच धंदा थाटला होता. पठाण याच्या आत्महत्येमुळे स्वामीच्या अनेक गैरप्रकरणावर प्रकाश झोत पडणार आहे. या प्रकरणात स्वामी कुटुंब फरार आहे. पोलीस अधिक तपास करत आहेत. दरम्यान स्वामी करत असलेल्या गैरप्रकरणांना मदत करणारे व गर्भचाचणीसाठी व गर्भपातासाठी ग्राहक घेऊन येणाऱ्या दलालांचाही शोध घेण्याची गरज आहे. बार्शी शहरातील स्वामीचे लागेबांधे मुळापासून तपासण्याची गरज आहे.

## विठुरायाच्या दर्शनासाठी तेलंगणाचे संपूर्ण मंत्रीमंडळ येणार

### हेलिकॉप्टरमधून वारकऱ्यांवर करणार पुष्पवृष्टी

✔ सुराज्य/सोलापूर

आषाढी वारीसाठी लाखो वारकरी पंढरीच्या दिशेनं निघाले आहेत. संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराजांच्या पालख्यांसह इतर संताच्या पालख्यांसोबत मोठ्या संख्येनं वारकरी आहेत. अशातच या आषाढी वारीच्या महासोहळ्यात सहभागी होण्यासाठी तेलंगणाचे मुख्यमंत्री के चंद्रशेखर राव पंढरपुरात येणार आहेत. त्यांच्यासोबत तेंलगणा सरकारचे संपूर्ण मंत्रिमंडळ देखील हजेरी लावणार आहे. तसेच हेलिकॉप्टरमधून वारकऱ्यांवर पुष्पवृष्टी करण्यात येणार आहे. ३०० गाड्यांच्या ताफ्यातून हे मंत्रिमंडळ महाराष्ट्रात दाखल होणार आहे.

के चंद्रशेखर राव हे २७ जूनला पंढरपूरला येतील. विठ्ठल दर्शनासोबत ते वारकऱ्यांशी संवाद देखील साधणार आहेत. खरे तर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे दशमी दिवशी म्हणजे २८ जून रोजी पंढरपूरमध्ये येत असताना त्याच्या एक दिवस आधी चंद्रशेखर राव पंढरपुरात पोहोचणार आहेत. आषाढीपूर्वीच पुण्यापासून सर्व पालखी मार्गावर आणि पंढरपूर शहरात बीआरएसकडून जोरदार होर्डिंगबाजी करण्यात आली आहे. यातच आता खुद्द या पक्षाचे अध्यक्ष पंढरपूरला येणार असल्याने या आषाढी यात्रेत राजकिय वातावरण देखील तापणार आहे. अब की बार किसन सरकार असे म्हणत बी आर एस पक्ष महाराष्ट्रात जोरदार एंट्रीच्या तयारीत आहे. मुख्यमंत्री के चंद्रशेखर राव यांनी थेट वैष्णवांचा महामेळा असणाऱ्या आषाढी यात्रेचा मुहूर्त निवडला आहे. आषाढी वारीसाठी गेले अनेक वर्षापासून मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री दिग्विजय सिंग येत असतात. पण आता तेलंगणाचे मुख्यमंत्री के चंद्रशेखर राव हे आता संपूर्ण मंत्रिमंडळासह विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपुरात येणार आहेत.



### पक्ष संघटना वाढीसाठी महासोहळ्याची निवड

देशात शेतकऱ्यांचे राज्य आणण्याची घोषणा देत कामाला लागलेले चंद्रशेखर राव यांच्या बीआरएस पक्षाच्या गळाला महाराष्ट्रातील अनेक राजकीय नेते लागले आहेत. यातच महाराष्ट्रात पक्ष संघटना वाढवण्यासाठी बीआरएसने वारकरी संप्रदायाचा सर्वात मोठ्या महासोहळ्याची निवड केली आहे.

### भालके यांची टीम स्वागतासाठी सज्ज

काही दिवसापूर्वी पंढरपूरचे भगीरथ भालके यांनी चंद्रशेखर राव यांची भेट घेऊन बीआरएस पक्षात प्रवेश संदर्भात चर्चा केली होती. आता आषाढीला चंद्रशेखर राव येत असताना त्यांच्या स्वागतासाठी भगीरथ भालके आणि त्यांची भलीमोठी टीम सज्ज असणार आहे. आता आषाढीला येणाऱ्या या राजकीय नेत्यांपैकी पंढरीचा पांडुरंग कोणाला पावणार? हे येणार काळच ठरवेल.

## दर्शन रांगेत भाविकाचा मृत्यू.. विठ्ठलाच्या दर्शनाची इच्छा अपुरी

✔ सुराज्य/पंढरपूर

आषाढी यात्रेचा सोहळा अगदी काही दिवसांवर आलेला आहे. गेल्या काही दिवसांपासून पंढरपूरमध्ये आपल्या लाडक्या विठुरायाच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. भाविकांच्या गर्दीमुळे विठुरायाच्या दर्शनासाठी सध्या ८ तास लागत आहेत. अशातच काल रात्री ८ वाजण्याच्या सुमारास पंढरपूरमध्ये एक हृदयद्रावक घटना घडली.

विठ्ठल दर्शनासाठी आस लावून बसलेल्या एका वृद्ध भाविकाचा विठुरायाचे दर्शन अवघ्या काही पावलांवर असतानाच दुर्दैवी अंत झालाय. याबाबत सविस्तर वृत्त असं की भगवान घनश्याम भोसले, (वय ७६, राहणार विटा) हे भाविक काल दुपारच्या सुमारास विठुरायाच्या दर्शनासाठी रांगेत लागले. दरम्यान गेल्या ५ ते ६ तासांपासून उभे असलेले भाविक भगवान भोसले हे विठ्ठलाच्या दर्शनापासून अवघ्या काही पावलांवर असतानाच विणे गल्ली येथील दर्शन पुलावर कोसळले. ते कोसळल्यावर तातडीने रुग्णवाहिका मागविण्यात आली मात्र मंदिर समितीने पुलावरून खाली उतरण्यासाठी कोणताही इमर्जन्सी पर्याय तयार केलेला नाही. त्यामुळे या भाविकाला भाविकांच्या रांगेतून गर्दीच्या विरुद्ध दिशेने खांद्यावर उचलून कासार घाट इथेपर्यंत उलटे न्यावे लागले. दरम्यान याचदरम्यान तातडीने उपचार न मिळाल्याने भगवान भोसले यांचा मृत्यू झाला होता. पंढरपूर येथील उपजिल्हा रुग्णालयामध्ये त्यांना मृत घोषित करण्यात आले.

## साईंच्या शिर्डीत नोटांचा पाऊस

✔ **अहमदनगर :** शिर्डीत २ हजाराच्या नोटा खपवण्यासाठी लोक वेगवेगळ्या युक्त्या शोधू लागले. ३० सप्टेंबर पर्यंतच दोन हजारांच्या नोटा चलनात सुरू राहणार असल्याने गेल्या महिनाभरात साईबाबांच्या दानपेटीत २००० च्या नोटांचे दान वाढले आहे. अवघ्या महिनाभरात तब्बल अडीच कोटी रुपयांच्या १२ हजार नोटा साईबाबांच्या दानपेटीत मिळाल्या आहेत.

रिझर्व्ह बँकेने निर्णय घेत ३० सप्टेंबर नंतर दोन हजारांची नोट चलनातून बंद करण्याचा निर्णय घेतला. साईंच्या दानात तुरळक आढळणाऱ्या दोन हजारांच्या नोटा भक्त दान करताना दिसत आहेत.

## अजितदादांच्या वाटेत भुजबळांनी पेरले 'सुरूंग'...

✔ सुराज्य/विशेष प्रतिनिधी

पक्ष संघटनेतील पदांच्या वाटणीवरून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पेटलेला वणवा शांत होईल,असे दिसत नाही. ज्येष्ठ नेते अजितदादा यांनी पक्ष संघटनेत काम करण्याचा आग्रह धरून नव्या वादाला फोडणी टाकलेली असतानाच अन्य एक ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनीही एक वेगळेच विधान करून अजितदादांच्या वाटेत जणू 'सुरूंग'च पेरले आहे. त्यामुळे पदे घेण्या-देण्यावरून राष्ट्रवादीत घमासान माजण्याची शक्यता दिसत आहे



विरोधी पक्षनेतेपदातून मुक्त करून आपल्याला पक्ष संघटनेतील कुठलेही पद देण्याची मागणी अजितदादांनी बुधवारच्या मुंबईतील पक्षाच्या मेळाव्यात शरदरावांच्या समक्ष केली होती.ही अपेक्षा म्हणजे अजितदादांना प्रदेश अध्यक्ष होण्याची तमन्ना असून पक्षावर ताबा मिळवण्याचाही त्यांचा मनसुबा असल्याचे सांगण्यात येते. अजितदादांनी ही मागणी रेटलेली असतानाच भुजबळ यांनी वेगळेच विधान करून एकप्रकारे अजितदादांना शह देण्याचा प्रयत्न केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये ओबीसी किंवा इतर समाजाच्या नेत्याला प्रदेशाध्यक्ष करण्याची मागणी भुजबळ यांनी केली आहे. विरोधी पक्ष नेतेपद जर मराठा समाजाकडे असेल तर प्रदेशाध्यक्ष पद ओबीसी किंवा लहान समाजाकडे हवे, असे भुजबळ म्हणाले. आमचा पक्ष लोकशाहीने चालणारा आहे. प्रत्येकाला आपले मत मांडण्याचा अधिकार आहे. त्यांना वेगळे पद किंवा काम करायचे आहे पण ते पक्षातच काम करणार म्हणतात. माझे मत सुद्धा मी मांडतो. मला फक्त चार महिने अध्यक्षपद मिळाले.

## लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार

✔ सुराज्य/सोलापूर


वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या २३ वर्षीय तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून तिला महाबळेश्वर येथे नेऊन तिच्यावर अत्याचार केला. तसेच अत्याचारावेळीचे काढलेले फोटो व्हायरल करण्याची धमकी दिल्याप्रकरणी तरुणासह त्याच्या कुटुंबातील सहा जणांवर फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.



आरोपीने पीडितेला डिसेंबर २०२२ मध्ये महाबळेश्वरला नेले. तेथे आरोपी नितीन राजप्पा कटके (वय २४, बसवेश्वर गल्ली, लातूर) याने तिच्यावर अत्याचार केला. तेथून दुसऱ्या रिसॉटवर नेऊन अत्याचार करत त्यावेळी त्याने फोटो काढले. त्यानंतर काही दिवसांनी ते फोटो व्हायरल करण्याची धमकी देत आरोपींनी पीडितेला जबरदस्तीने आळंदी येथे नेऊन तिला स्वता:सोबत लग्न करण्यास भाग पाडले. याबाबत पीडितेने कुटुंबीयांना सांगितले. पीडितेच्या कुटुंबीयांनी आरोपीच्या वडिलाला भेटून अत्याचाराचे फोटो डीलिट करण्यास सांगितल्यानंतर यासाठी २० लाख रुपयांची मागणी केली, अशा आशयाची फिर्याद पीडितेने दिली आहे. या फिर्यादीवरून नितीन कटके ( वय २४, रा. लातूर), काशीनाथ कटके, निकेतन कटके, रेष्मा कटके ( सर्व रा. पुणे), किसन, ज्योती यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा तपास पोलीस करत आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



अजून किती धीर धरायचा?

कल्याण
259-61-588

## जलसंकट : पावसाची दांडी; सोलापूरची घाबरगुंडी

### शहरातील पाणीपुरवठ्यात २० टक्के होणार कपात

✔ सुराज्य/सोलापूर



सोलापूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या उजनी धरणातील पाणी पातळी वरचेवर घटत आहे. पावसाने दडी मारल्याने ही पातळी घटत आहे. महापालिका अधिकाऱ्यांनी उजनी धरण परिसराची पाहणी केली. या काळात पाणी पातळी घटत चालल्याचे दिसून आले. सध्या उजनीतील पाणी पातळी वजा ३० टक्के पर्यंत आली आहे. त्यामुळे शहरातील पाणीपुरवठ्यात १५ ते २० टक्के कपात करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे.

सध्या आषाढी यात्रा असल्याने उजनीतून पाणी सोडण्यात येत आहे. ४५०० क्युसेक्सने चंद्रभागेत उजनीतून पाणी सोडण्यात आले आहे. यानंतर उजनी धरणातील पातळी आणखी कमी होणार आहे. वेळेत पाऊस होण्याची गरज आहे मात्र तसे न झाल्यास ही पातळी अधिक घटणार आहे. यामुळे सोलापूर महापालिका प्रशासनाने उजनी धरणात दुबार पंपिंगचे नियोजन केले आहे. त्याची कार्यवाहीही पूर्ण करण्यात आली आहे. बुधवारी चाचणी ही पूर्ण केली आहे. सोलापूर शहराला सध्या चार दिवसाआड तीन तास पाणीपुरवठा करण्यात येतो. पाणी पातळी घटल्याने पुढील नियोजन करण्याकरिता २० टक्के पाणी कपात करण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला आहे. यामुळे या तीन तासांपैकी अर्धा तास पाणीपुरवठा कमी होणार असल्याचेही अतिरिक्त आयुक्त कारंजे यांनी स्पष्ट केले. सध्या उजनीतून ८० ते ९० एमएलडी शहरासाठी पाणी घेतले जाते तर हिप्परगा तलावातून वीस एमएलडी पाणी घेतले जाते. आणि नदीद्वारे ५० ते ६० एम एल डी पाणी घेण्यात येते. सोलापूर शहरवासीयांनी पाण्याचा वापर काटकसरीने करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहनही कारंजे यांनी केले आहे.

### दुबार पंपिंगची यंत्रणा २५ जूनपासून कार्यान्वित : कारंजे

उजनी धरणातील पातळी वजा ३५ टक्के झाल्यानंतर ही दुबार पंपिंगची यंत्रणा साधारणता: २५ जून पासून कार्यान्वित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. येत्या दोन-तीन दिवसात पाणी पातळी आणखी कमी कमी होण्याची शक्यता आहे. १० एचपीचे ३० पंप कार्यान्वित करण्यात येणार असल्याचे अतिरिक्त आयुक्त कारंजे यांनी सांगितले.

### कामगार, पंपासाठी मिळून ७० लाखांचा खर्च

उजनी धरणातून दुबार पंपिंग करून शहरासाठी पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. यासाठी नियोजन पूर्ण करण्यात आले आहे. या अंतर्गत तेथे १० एचपीच्या ३० पंप, २० एचपीचे दोन पंप आणि ३० एचपीचे दोन पंप अशी यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. ही यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी एजन्सी नेमून कर्मचारी कंत्राट पद्धतीने घेण्यात आले आहेत. येथील या कामगारांचा खर्च दहा ते पंधरा लाख रुपये होणार आहे तर पंपसाठी ५५ लाख रुपये खर्च आहे, असेही अतिरिक्त आयुक्त कारंजे यांनी सांगितले.

### पातळी वजा ५५ टक्क्यांपर्यंत खाली गेल्यास तिबार पंपिंग

पाणी पातळी वजा ५५ टक्के पर्यंत खाली गेल्यास तिबार पंपिंग करावी लागते. यापूर्वी नऊ वर्षांपूर्वी तिबार पंपिंग करण्याची वेळ आली होती. साधारणतः अशीच पातळी घटत गेल्यास १५ जुलै नंतर तिबार पंपिंग करावी लागेल, असेही कारंजे यांनी स्पष्ट केले. त्यानंतरही पावसाने आणखी दडी मारल्यानंतर पाणी पातळी घटल्यास अखेर सोलापूर शहराला रेल्वेने पाणी आणावे लागेल.

# उपाय फसला...

केंद्र सरकारने २ जूनला डाळींच्या साठ्यावर मर्यादा घालून त्यांची दरवाढ आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. पण, अद्याप डाळींच्या दरात घट झालेली नाही. डाळींच्या दरात तेजी का आली? हा खरा प्रश्न आहे. शेतमालाच्या किमतीत वाढ झाली की केंद्र सरकार आपला हुकमी एक्का म्हणून साठा मर्यादा लागू करते. अनेकदा साठा मर्यादेची मात्रा लागू पडते. पण आडातच नाही तर पोहऱ्यात कुठून येणार, अशी अवस्था आता डाळींची झाली आहे. त्यामुळे साठा मर्यादेनंतरही डाळींच्या, विशेषत: तूर आणि मुगाच्या किमतीत नरमाई आलेली नाही. २ जूनपासून ३१ ऑक्टोबरपर्यंत साठा मर्यादा लागू असणार आहे. किरकोळ विक्रेत्यांसाठी पाच टन, घाऊक विक्रेत्यांसाठी २०० टन, मोठ्या साखळी विक्रेत्यांसाठी प्रत्येक किरकोळ विक्री केंद्रावर पाच टन आणि गोदामात २०० टन आणि डाळ मिलसाठी एकूण क्षमतेच्या २५ टक्क्यांपर्यंत साठा करण्यास परवानगी असणार आहे. केंद्र सरकारकडून राज्यांच्या सरकारकडून दर आठवड्याला राज्यनिहाय साठ्याचा आढावा घेतला जाणार आहे. किरकोळ बाजारात डाळीचे दर शंभरीपार गेले आहेत. तूर डाळीच्या किमती ११० ते १३० रुपये प्रतिकिलो आहेत. चांगल्या प्रतीची तूर डाळ १७० रुपयांवर गेली आहे. हरभरा डाळ ८४ रुपयांवर, उडीद डाळीचा दर १२५ रुपयांवर, मूग डाळ १४९ रुपयांवर, मसूर डाळ १०५ रुपयांवर गेली आहे. सरकार महागाई आटोक्यात आल्याचे दावे करत असले तरीही डाळींच्या वाढत्या किमतींमुळे सर्वसामान्य कुटुंबांचे आर्थिक गणित बिघडले आहे,हे मात्र नक्की. मागील वर्षाच्या तुलनेत यंदा डाळींच्या उत्पादनात २.०२ लाख टनांनी वाढ होण्याचा अंदाज आहे. सन २०१०-११च्या तुलनेत २०२१-२२मधील डाळींच्या उत्पादनाचा विचार करता डाळींच्या उत्पादनात ४८ टक्क्यांनी वाढ झाली आहे. पण, इतके उत्पादन पुरेसे नाही, असे जाणकार व्यापारी सांगतात. सन २०२२-२३ मध्ये वाटाण्याची ०.८६ हजार टन, हरभऱ्याची ६२.९२ हजार टन, मसूरची ८५८.४४ हजार टन, तुरीची ८९४.४२ हजार टन आणि ५५६.७१ हजार टन उडीद डाळींची आयात करण्यात आली होती. ऑस्ट्रेलिया, म्यानमार, कॅनडा, मोझॅम्बिक आदी देशांतून डाळींची आयात होते. डाळींच्या आयातीवर आर्थिक वर्ष १८-१९मध्ये भारताने आठ हजार कोटी रुपये, तर २१-२२ या आर्थिक वर्षात साडेसोळा हजार कोटी रुपये खर्च केले होते. आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये सर्वाधिक २८.५२३ कोटी रुपये डाळींच्या आयातीवर खर्च करावे लागले होते. डाळींच्या आयातीत कायम चढ-उतार होत राहिला आहे. देशात होणारा मोसमी पाऊस, उत्पादनाची स्थिती यावर आयातीची स्थिती अवलंबून असते. डाळींच्या वाढत्या आयातीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने जून २०२२मध्ये डाळींबाबत आत्मनिर्भर होण्याची घोषणा केली. केंद्र सरकारच्या कृषी खात्याच्या अंदाजानुसार २०२२मध्ये देशाची एकूण डाळींची मागणी सुमारे २९० लाख टनांच्या घरात आहे. उत्पादन साधारण २७३ लाख टन झाले. परदेशातून सुमारे अडीच लाख टन डाळींची आयात करावी लागली. भविष्याचा विचार करता सन २०३०-३१मध्ये देशाची एकूण डाळींची मागणी ३५२ लाख टनांवर जाण्याची शक्यता आहे. उत्पादनात तितकी वाढ होण्याची शक्यता नाही. त्यामुळे भविष्यात डाळींच्या आयातीवरील अवलंबित्व वाढण्याची शक्यता आहे. जागतिक तापमानवाढीचा परिणाम म्हणून मोसमी पावसाची अनियमितता, अवकाळी, गारपीट, उष्णतेच्या लाटा यांसारख्या नैसर्गिक आपत्तींची शक्यता वाढली आहे. त्याचा थेट परिणाम शेतमालाच्या उत्पादनावर होताना दिसत आहे. उत्पादन वाढीसाठी फारसे प्रयत्न होताना दिसत नाहीत. कृषी विद्यापीठांकडून अपेक्षित संशोधन, मार्गदर्शन होताना दिसत नाही. किंबहुना विद्यापीठांनी संशोधन करावे, असे मनुष्यबळ, निधी आणि पायाभूत सुविधाच विद्यापीठांकडे नसल्याचे वास्तव आहे.



सामाजिक

# पाणी वाहता वाहता चाललंय जिणं....

राज्यात जलजीवन मिशनचा नारा देऊन कागदावर कागद रचले, योजना आल्या, विहिरी झाल्या, पाणी आले, मात्र ते फक्त कागदावरच असल्याचे चित्र आहे. कारण आजही अनेक भागात तीव्र पाणीटंचाई जाणवते आहे. महिलांच्या जीवनात रोजचा संघर्ष असून निम्मं आयुष्य पाणी वाहण्यात चालल्याचे वास्तव नाकारता येणार नाही. एक हंडा पाण्यासाठी रात्र रात्रभर विहिरीजवळ, हातपंपाजवळ मुक्काम करावा लागत आहे. दुसरीकडे राज्याचे मुख्यमंत्री म्हणतात, 'माझ्या खिशाला दोन दोन पेन असून उठता-बसता, चालता फिरता नुसत्या प्रकल्पावर, कामांच्या मंजुरीवर सह्या करत असल्याचे ते म्हणाले. मात्र, इतक्या सह्या करूनही आजही अनेक भागातील पाणी प्रश्न का मिटत नाही. पाणी प्रश्नांची फाईल मंत्रालयापर्यंत पोहोचलीच नसेल का? असा सवाल या निमित्ताने उपस्थित होतो आहे.'

आजघडीला नाशिक जिल्ह्याचा विचार केला तरी गेल्या अनेक वर्षांपासून मार्च महिन्यापासून ते जून पर्यंत भीषण पाणीटंचाईला सामोरे जावे लागते. अशातच निम्मा दिवस जर पाणी आणण्यात जात असेल तर, मजुरीवर कधी जायचं, खायचं कधी असा पेचप्रसंग या नागरिकांसमोर उभा राहतो. परिणामी नाशिक जिल्ह्यातील पेठ, सुरगाणा, त्र्यंबक तालुक्यातील अनेक नागरिक स्थलांतर करत असतात. मुळात त्र्यंबक तालुका हा आदिवासी तालुका असून इथली जनता पूर्णपणे शेतीवर अवलंबून आहे. त्यातही पावसाच्या पाण्यावर अधिकची शेती केली जाते. मात्र जसजसा मार्च महिना सुरु होतो, तसतशी पाण्याची बिकट समस्या या लोकांना भेडसावते. परिणामी घरातील महिला, लहान मुली पाण्यासाठी दाहीदिशा हिंडत असतात. कुठे नदीवर, तर कुठे झिऱ्यावर मैल अन् मैल फिरत असतात. मात्र पाणी कुठेच सापडत नाही, सापडते ती फक्त निराशा....

एकीकडे जलजीवनची मोठी जाहिरात सरकारकडून, स्थानिक प्रशासनाकडून करण्यात येते. त्याचबरोबर कामांचा पसारा देखील दाखविण्यात येतो. मात्र प्रत्यक्षात वस्तुस्थिती वेगळी पाहायला मिळते. त्र्यंबकेश्वर तालुक्यातील अनेक गावांना लागूनच विहिरी आढळून येतील, मात्र पाण्याचा थेंब दिसणार नाही. ग्रामपंचायतींच्या माध्यमातून पाणी पुरवठा योजना देखील एकदा नव्हे दोन तीनदा झाल्याचे गावकरी सांगतात. मात्र प्रत्यक्षात नळ आहे, मात्र पाणीच नाही.. म्हणायला गावाला नळ पाणी पुरवठा योजना अन् महिलांच्या डोक्यावरील हंडा तसाच.... गेल्या अनेक वर्षांपासूनची अशीच परिस्थिती असून मागील वर्षीचा शेंद्रीपाडा असो की आता पाणीटंचाई गावे असोत, सगळीकडे चित्र सारखेच. मग हे बदलणार कधी? गावात दारू उपलब्ध होते, मात्र पिण्याचे पाणी नाही...

सामाजिक कार्यकर्त्या मयुरी धुमाळ यांनी नुकताच एका सर्वेक्षणांती पाणी प्रश्नांवर अहवाल सादर केला. त्यानुसार त्र्यंबक तालुक्यातील हर्सूलजवळच्या गावातील महिलांना सगळी कामे सोडून पाण्यासाठी धावावं लागत. विहिरी, हातपंपाजवळ बसून राहाव लागतं. महिलांच्या म्हणण्यानुसार गावात दारू सहज उपलब्ध होते, मात्र, पिण्याची पाण्याची सोय होत नाही, ही येथील शोकांतिका आहे. गावातील महिला परिसरातील पाणी भरण्यासाठी हातपंपावर जवळ रात्र झोपून काढावी लागते अन् एकदा नंबर आला की रात्रभर पाणीच वाहायचं, असं एकूण चित्र आहे. त्यामुळे प्रश्न फक्त पाण्याच्या उपलब्धतेचा नाही, तर महिलांच्या आयुष्याशी निगडीत आहे. पाण्यासाठी इतके कष्ट घ्यावे लागतात, महिला मुलींना वणवण भटकावे लागते? हा संघर्ष कधी थांबणार? हर घर जल योजना कधी पोहचणार? असे असंख्य सवाल उपस्थित होतात. **- गोकुळ पवार.**

***एकीकडे राज्यात राजकीय नेत्यांचे आरोप प्रत्यारोप सुरु आहेत, वादांमुळे धार्मिक वातावरण कलुषित झाले आहे. राजकीय सत्ताधारी-विरोधक आपली भूमिका बजावत आहेत. मात्र, दुसरीकडे वर्षानुवर्षे पाण्याचा प्रश्न 'जैसे थे' आहे. आजही घर घर नल योजना नावालाच असल्याचा प्रत्यय येत असून नाशिक ग्रामीण भागातील माउल्यांना आजही डोंगर चढून उतरून पाण्याचा थेंबासाठी जीव धोक्यात घालावा लागण्याची परिस्थिती आहे.***



### नुसते आरोपांचे राजकारण

एकूणच केंद्र सरकार, राज्य सरकार जनतेच्या भल्यासाठी निर्णय घेत असते. जनतेचे जगणे सुखकर व्हावे म्हणून असंख्य योजना लागू करते. मग तरीदेखील अजूनही पाण्यासाठी वणवण का? वेगवेगळ्या योजना राज्यात लागू करत असताना, पाणी प्रश्न कुणालाच दिसत नाही का? महिलांचा पाण्यासाठीचा संघर्ष कुणाला दिसत नाही? सरकार इतर योजना कमी करून पाणी प्रश्नाला प्राधान्य का देत नाही? नुसते आरोपांचे राजकारण सुरु आहे, मात्र इथल्या महिलांना पाण्यासाठी रोजच मरणयातना सहन कराव्या लागत असताना, कुठे आहे महाराष्ट्राचे पाणी धोरण? हे सगळे आणि सगळे प्रश्न उपस्थित होत आहेत, होत राहतील, जोपर्यंत या महिलांच्या डोक्यावरचा हंडा, कमरेवर आणि कमरेवरच्या हंडा खाली येत नाही तोपर्यंत...

टुडेज् ब्लॉग

# आता करायचे काय?

**आपल्या मुलांच्या मनातले ओळखणारी आई आणि भविष्य घडविणाऱ्या बापाच्या मनात आजच्या घडीला एकच प्रश्न निर्माण होत आहे, तो म्हणजे आता करायचे काय? खरंच आजच्या काळात काही हाताच्या बोटावर मोजण्या इतके आई-वडील सोडले तर अशा अनेक आई-वडिलांच्या मनात एकच प्रश्न पडलेला असतो तो म्हणजे आता करायचे काय? तसेच शेवटी जगायचे की मरायचे असाही प्रश्न निर्माण होतो. तेव्हा असा प्रश्न आपल्या आई-वडिलांच्या मनात येऊ नये म्हणून प्रत्येक मुलांनी आई-वडिलांचे मनापासून पालनपोषण करणे आवश्यक आहे. याची जाणीव आजच्या मुलांना करून देण्याची नितांत गरज आहे.**




मुले लहान असताना आई-वडील इतकी काळजी घेतात की, तीच मुले मोठी झाल्यावर आपल्या आई-वडिलांना विचारतात तुम्ही माझ्यासाठी काय केले? त्यावेळी आई-वडील मूक गिळून गप्पा बसतात. कारण रागाच्या भरात बोललो तर तेवढीच शेजाऱ्यांना ब्रेकिंग न्यूज मिळेल. नंतर चर्चा रंगायला लागतील. त्यामुळे गप्प बसणेच आई-वडील पसंत करतात. शेवटी आपल्या घरातील भांडण चव्हाट्यावर नको म्हणून आई-वडील मूक गिळून गप्प बसतात. काही मुले तर इतकी शहाणी असतात की, आई-वडील सुशिक्षित असून त्यांनी मुलांना उच्चपदावर नोकरीला लावून सुद्धा आई-वडिलांना भेटल्यानंतर छाती पुढे करीत आणि गॉगल डोक्यावर लावत रुबाबात आई-वडिलांना म्हणतात की, 'तुमच्यामुळे घरात भांडण होते. अशी मुले आई-वडिलांना बोलायला विसरत नाहीत. आता सांगा यात कोणाचे चुकले, नंतर बोलून झाल्यावर मागच्या पावलांनी बायकोजवळ जाऊन गप्प बसतात.

सध्याच्या युगात आई-वडिलांनी करायचे काय हा दिवसेंदिवस वाढत असलेला प्रश्न आहे. त्यामुळे राज्य तसेच देशातील वृद्धाश्रमांची संख्या वाढते आहे हे सत्य नाकारता येणार नाही. त्यात काही आई-वडील लहानपणी मुलीपेक्षा मुलाचे अधिक लाड करीत असतात. म्हणे वंशाचा दिवा. मात्र, वंशाचा दिवा मोठेपणी काय करतो हे जगाला समजले सुद्धा पाहिजे. तरच उद्याचे आई-वडील सुरक्षित राहू शकतात. असेच चालले तर त्यांना म्हातारपणीचा आधार कोण? सध्या तर वृद्धाश्रमांची वाढती संख्या लक्षात घेता लोकांच्या रोजगाराच्या दृष्टीने ठीक असले तरी शेवटचा पर्याय म्हणून जड अंत:करणाने वृद्ध लोक राहात असतात.

आज आपल्याला स्वत:च्या पायावर उभे केले त्या माझ्या लाडक्या आई-वडिलांना आता माझी गरज आहे. त्यांना आता मी जिवापलीकडे सांभाळीन असे प्रत्येक मुलांनी केले पाहिजे. तेव्हा आई-वडील हेच माझे सर्वकाही आहे. आज जो काय आहे, तो त्यांच्यामुळे मी उभा आहे. याची जाणीव प्रत्येक मुलांना व्हायला पाहिजे. त्यासाठी बालपणी मुलांचे खाण्या-पिण्याचे लाड करावे. मात्र, अति फाजील लाड करू नये.लहानाचे मोठे आई-वडिलांनी केले. ताठ मानेने जगायला शिकवले, त्याच आई-वडिलांना आता तुमची गरज आहे. तुम्ही त्यांना सांभाळा अशी सांगण्याची वेळ मुलांवर येता कामा नये. तरच खऱ्या अर्थाने आई-वडिलांच्या मनात आता करायचे काय? असा प्रश्न निर्माण होणार नाही. तरच आई-वडील अखेरचे दिवस गुण्यागोविंदाने घालवतील. त्यासाठी माणुसकी जोपासता आली पाहिजे. हेच नेमके सध्याच्या पिढीला समजत नाही. कारण माणुसकी जोपासता आली असती तर त्यांना रक्ताची नाती समजली असती. ती टिकवता आली असती. त्यामुळे आई-वडिलांच्या मनात आता करायचे काय असे म्हणण्याची वेळच आली नसती. तेव्हा आजच्या मुलांनी आपले बालपण आठवावे. आपल्याला आपल्या आई-वडिलांनी कसे घडविले याची जाणीव ठेवून म्हातारपणी उत्तम प्रकारे संगोपन करावे. म्हणजे आई-वडिलांनी आता करायचे काय? असे म्हणण्याची वेळ आई-वडिलांवर येणार नाही. **- रवींद्र तांबे.**

जन्म हा अखेरचा

## प्राणानुग्रहस्थल - ३



श्रोत्राचा श्रोत्र आहे, मनाचे मन आहे आणि प्राणाचा प्राण आहे. त्याच्या प्रेरणेशिवाय गवताचे पातेदेखील हलत नाही. अशा भगवान शिवात शिवयोगी कुंभक करुन आपला प्राण विलीन करतो. तरीही त्याचे शरीरव्यवहार चालू असतात. शिव शरीरातच असल्यामुळे त्याच्यात विलीन झालेला प्राणदेखील शरीरातच असतो. त्याच्या शक्तिसंस्काराच्या बळावर त्याचे शरीर टिकून असते. प्राण शरीराचा रक्षक आहे. शरीर कितीही जीर्ण-शीर्ण होऊन पडले, त्याच्या आसपास कोणी नसले, तरीही शरीरात जोपर्यंत प्राण आहे तोपर्यंत त्याच्याजवळ कावळा येत नाही की कुत्रा. ज्या क्षणी प्राण सोडून जातो, तेव्हा ते शव होते आणि त्याला कुरतडण्यासाठी कावळे-कुत्रे-मुंग्या जवळ येतात. प्राण असलेल्या शरीराजवळ मात्र ते येत नाहीत. प्राण असा शरीराचा रक्षक आहे. म्हणून प्राण शिवात विलीन झाला तरी त्याच्या शक्तिसंस्काराच्या बळावर शिवयोग्याचे शरीरव्यवहार चालू असतात.

**स चाक्ष्यासवशाद् भूय:**
**सर्वतत्त्वातिवर्तिनी ।**
**निष्कलंके निराकारे**
**निरस्ताशेषविक्लवे ।।**
**चिद्विलासपरिस्फुर्तिपरिपूर्णसुखाद्वये ।**
**शिवे विलीन: सर्वात्मा योगी चलति**
**न क्वचित् ।।१७.३२।।**

शिवयोग्याच्या निश्चल स्थितीचे वर्णन या श्लोकात केले आहे. वायू आत घेणे, त्याला आत रोधून कुंभक करणे आणि नंतर रेचक करणे असे वारंवार करीत राहणी यालाच 'अभ्यास' म्हणतात. एक श्लोक पुन्हा पुन्हा वाचला की पाठ होतो. अभ्यासाने संस्कार दृढ होतो. कुंभक करुन जीवाचा आधार असलेला प्राणवायू शिवयोगी परशिवात विलीन करतो. हा परशिव कसा आहे? भूमी आदी छत्तीस तत्त्वांच्या अतीत आहे. तो निष्कलंक आहे, निराकार आहे. म्हणून सर्व आकारात एकाच परमेश्वराचह पूजा केली जाते. आकार कुठलाही असो, मूर्ती कोणतीही असो, तिची केली जाणारी पूजा म्हणजे निराकार परब्रह्माची पूजा असते. परंतु माणसांच्या वेडेपणाला आणि आंधळेपणाला मर्यादा नाहीत. ते मूर्तीच्या आकार-प्रकारावरुन एकमेकांशी भांडत असतात. माझा देव मोठा की तुझा देव मोठा? हा त्यांच्या संघर्षाचा मुद्दा असतो. आपला मालक कोणताही वेष घालून आला तरी कुत्रा त्याला बरोबर ओळखतो. परंतु मनुष्य मात्र दुसरा आकार घेऊन येणाऱ्या परमेश्वराला ओळखत नाही. 'तू माझा परमेश्वर नाहीस, असे तो त्याला बजावतो.'

**(क्रमश:) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

जनमानस

## महिला सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर...!

महिला सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

राज्यात महिला सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पहाटे कामावरून घरी परतणाऱ्या एका संगणक अभियंता तरुणीवर रिक्षा चालकाने लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना पुण्यातील वानवडी परिसरात घडली. अर्थात महिला अत्याचाराची ही राज्यातील ही पहिली घटना नाही. दररोजच्या वर्तमानपत्रात महिला अत्याचाराची एक तरी घटना हमखास वाचायला मिळते याआधी मुंबईतील सावित्रीबाई फुले वसतिगृहातील विद्यार्थिनींची सुरक्षा राक्षकाने हत्या केल्याची बातमी आली. ती बातमी ताजी असतानाच पुण्यात एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थिनींची हत्या झाल्याची बातमी आली. मुंबईतही छत्रपती शिवाजी टर्मिनसहुन वाशिकडे हार्बर रेल्वेने परीक्षेसाठी येणाऱ्या वीस वर्षीय तरुणीवर नवाजू करीम शेख या नाराधमाने मज्जीद बंदर जवळ धावत्या डब्यातच लैंगिक बळजबरी करण्याचा प्रयत्न केला. अन्य प्रवाशांच्या तक्रारीनंतर रेल्वे पोलिसांनी त्याला चार तासात अटक केली. याबाबत रेल्वे पोलिसांचे अभिनंदनच करायला हवे. रेल्वे पोलिसांनी देखील याबाबत स्वत: ची पाठ थोपटून घेतली आहे. स्वत:चे कौतुक करून घेण्याचा त्यांचा अधिकारच आहे. मात्र महिला अत्याचाराच्या घटना घडून गेल्यानंतर आरोपींना पकडून शिक्षा देण्यापेक्षा महिला अत्याचाराच्या घटना घडूच नये यासाठी पोलिसांनी प्रयत्न करायला हवेत. दिवसाढवळ्या महिलांची अब्रू लुटून त्यांची हत्या करण्याची नाराधमी प्रवृत्ती अलीकडे जोर धरू लागली आहे. दिवसाढवळ्या अशा प्रकारचे गुन्हे करण्याची हिंमत नराधमांमध्ये निर्माण होते. याचाच अर्थ या नराधमांना कायद्याचा आणि राज्यातील सुरक्षा यंत्रणांचा धाक राहिला नाही. आपण कितीही मोठा गुन्हा केला तरी कायदा आपले काहीही करू शकत नाही. पैशाच्या जोरावर आपण कायदा आणि सुरक्षा यंत्रणांना आपण वाकवू शकतो अशीच धारणा या नराधमांची झाली आहे म्हणूनच ते असे मानवतेला काळिमा फासणारे कृत्य करत आहे. आज राज्यातील कोणत्याच महिला सुरक्षित नाही मग ती तीन वर्षाची चिमुरडी असो की सत्तर वर्षाची आजी. शाळा, कॉलेज, कामाचे ठिकाण, सार्वजनिक वाहन, स्वत:चे घर इतकेच काय तर पोलीस स्टेशन देखील महिलांसाठी सुरक्षित नाही असे दुर्दैवाने म्हणावे लागेल. **- श्याम ठाणेदार, पुणे.**

# नवे व्यवस्थापन, नवी आव्हाने

**बेस्टच्या महाव्यवस्थापकपदी नुकतीच विजय सिंघल यांची नियुक्ती करण्यात आली. मावळते अध्यक्ष लोकेश चंद्र यांनी मागील सोमवारी त्यांच्या हाती ही सूत्रे दिली. मात्र ही सूत्रे सुपूर्द करताना एक मोठे आव्हानही सिंघल यांच्या हाती पूर्ण करण्यासाठी दिले. हे आव्हान किती मोठे असेल, हे सिंघल यांनी कारभार हाती घेतल्यानंतर एक व दोन आठवड्यात कळून येईलच. मागील कित्येक वर्षांपासून बेस्ट मोठ्या आर्थिक तोट्यात आहे. ती फायद्यात नाही तरी निदान ना नफा ना तोटा' तरी चालेल, अशी कामगिरी नव्या महाव्यवस्थापकांना करावी लागणार आहे. जुन्या महाव्यवस्थापकांनी ज्या योजना सुरू केल्या, ज्या योजना पुढे नेल्या. त्या पद्धतशीरपणे तडीस नेऊन बेस्टला तिचे पुनर्वैभव प्राप्त करून देणे हे नव्या महाव्यवस्थापकांसमोर आव्हान राहणार आहे.**

वास्तविक पाहता नवे आलेले व्यवस्थापक हे बेस्टला नवे नाहीत. मुंबई महापालिकेत अतिरिक्त आयुक्त म्हणून ते २०२० सालापर्यंत होते. या कालावधीत मुंबई महापालिकेचेच एक अंग असलेल्या बेस्ट उपक्रमाच्या कामाशीही त्यांचा संबंध आला होता. त्यामुळे बेस्टशी संबंधित प्रश्न आणि समस्या याची त्यांना चांगलीच जाणीव त्यांना असेल. सिंघल यांनी ज्या कालावधीत पालिकेत काम केले होते, त्याच्या शेवटच्या वर्षात पालिकेचे आयुक्त म्हणून प्रवीण सिंग परदेशी होते. या पालिका आयुक्तांनी त्याकाळी बेस्टच्या कारभारात खूपच लक्ष दिले होते. त्या काळात मोठ्या प्रमाणात बेस्टला आर्थिक मदत देण्यात आली होती. त्यामुळेच बेस्ट उपक्रम समजून घेण्यासाठी विजय सिंघल यांना जास्त कष्ट करावे लागणारे नाही.

कोणताही परिवहन उपक्रम हा फायद्यात नसतो. बेस्टच्या परिवहन विभागाला आधार मिळावा म्हणून मुंबई शहरातील वीज पुरवठा हा बेस्ट उपक्रमाकडे त्याकाळी नियोजन कर्त्यांनी दिला होता. त्यात त्यांची मोठी दूरदृष्टी होती. सध्या बेस्ट उपक्रमाचे विजेचे साडेदहा लाख ग्राहक आहेत. बेस्टचा विद्युत विभाग हा पूर्वी फायद्यात होता. मात्र गेल्या दोन ते तीन वर्षांत हा विद्युत विभागही तोट्यात जाऊ लागला आहे. बेस्टचा परिवहन विभाग याआधीच तोट्यात आहे. एके काळी बेस्टकडे स्वमालकीच्या ४ हजार ५०० बस होत्या. आज बेस्टची मदार ही मोठ्या प्रमाणात कंत्राटदारांच्या बस गाड्यांवर आहे. आज स्वमालकीच्या फक्त १ हजार २०० बस आहेत, तर कंत्राटदारांच्या १ हजार ४०० बस आहेत. त्यात बेस्टकडे सध्या ओलेक्ट्रा, हंसा, मातेश्वरी, मारुती मो, स्विच मो. टाटा मोटर्स असे मिळून सहा-सात कंत्राटदार आहेत. दोन कंत्राटदारांनी बेस्टमधून या अगोदरच आपला गाशा गुंडाळला, असे बिनभरवशाचे कंत्राटदार व त्याचे बेभरवशाचे कामगार असताना त्यांना सांभाळणे बेस्ट उपक्रमाला खूप अवघड बाब बनून राहिली आहे. काहीही कारणे देऊन बेस्ट सेवा बंद पाडून मुंबईकरांची गैरसोय करणे ही तर आता नित्याचीच गोष्ट झाली आहे. त्यामुळे या कंत्राटदारांशी मिळते-जुळते घेऊन बससेवा नियमित सुरळीतपणे चालू ठेवणे हे मोठे आव्हानच नव्या व्यवस्थापकांसमोर आहे. बेस्टकडे सध्या ३ हजार ३०० बस आहेत. त्यात पुढील वर्षापर्यंत या बस गाड्यांची संख्या ७ हजार करण्याचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी मागील बेस्ट व्यवस्थापकांनी मोठ्या प्रमाणावर निविदा काढून बसगाड्यांच्या ऑर्डर दिल्या आहेत. त्यात २००



इलेक्ट्रिक विद्युत दुमजली बस गाड्या लवकरच समाविष्ट होणार आहेत. त्यातील १२ बस आल्या असून बाकी बस लवकरच येतील. ओलेक्ट्रा कंपनीला दिलेल्या २ हजार १०० वातानुकूलित विद्युत बसगाड्यांच्या कंत्राटाला टाटा मोटर्सने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. मात्र सर्वोच्च न्यायालयात याचा निकाल बेस्ट उपक्रमाच्या बाजूने लागला असून या २ हजार १०० बस येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. नुकत्याच चलोतर्फे बेस्टच्या ताफ्यात १०० प्रीमियम आल्या असून त्या २२ मार्गांवरून सुरूही झाल्या आहेत, तर लवकरच आणखी १०० प्रीमियम बस ताफ्यात दाखल होतील. याच्या व्यतिरिक्त बेस्टने अजून १५० मिनी डिझेल बस व ३ हजार विद्युत बसची तसेच ७०० आणखी दुमजली विद्युत बसच्या निविदा काढल्या आहेत. २०२७ सालापर्यंत एकूण १० हजार बस रस्त्यावर आणण्याचे बेस्टचे उद्दिष्ट आहे. सध्या बेस्टचा स्वत:चा ताफा १ हजार ३००च्या आसपास आला आहे. तर कंत्राटदाराच्या १ हजार ५०० बस रस्त्यावर आल्या आहेत. त्यात कंत्राटदाराचे रोजचे प्रति किमीचे भाडे बेस्ट प्रशासनास प्रदान करावे लागते, त्यामुळे रोज येणारे दैनंदिन उत्पन्न आणि खर्च यांचा नीट ताळमेळ बसत नाही. त्यामुळे बेस्टचा संचित तोटा वाढता वाढतच आहे. दर महिन्याला साधारण २०० कोटींचा तोटा बेस्टला सहन करावा लागत आहे. नवीन महाव्यवस्थापकांना हा तोटा कसा कमी करता येईल याकडे लक्ष द्यावे लागेल.

माजी पालिका आयुक्त प्रवीण परदेशी यांनी लोकांनी आपल्या खासगी गाड्या घरी ठेवून जास्तीत जास्त सार्वजनिक सेवांचा लाभ घ्यावा, यासाठी बेस्टचे प्रवासी भाडे अर्ध्यावर आणले होते आणि त्याची प्रतिपूर्ती मुंबई महापालिकेकडून देण्याची सोय करून ठेवली होती. बस भाडे कमी केल्यामुळे बेस्टचे उत्पन्न घटले आहे. त्यात बेस्टला महापालिकेकडून सध्या पैसे मिळतात, मात्र ते पैसे वेळेवर मिळत नाहीत. मागील वर्षीच्या अर्थसंकल्पात बेस्टला ८०० कोटी मिळाले, तर या वर्षी सुद्धा ८०० कोटी मदत मिळाली. गेल्या काही वर्षांत पालिकेने बेस्टला ६ हजार कोटी रुपये देऊन झाले आहेत. मात्र बेस्टचा तोटा कमी होताना दिसत नाही. एकीकडे स्वत:चा बस ताफा दिवसेंदिवस कमी होत आहे. पैसे नसल्याने बेस्ट स्वत:चा ताफा विकत घेऊ शकत नाही. दुसरीकडे मोठ्या प्रमाणात कर्मचारी वर्ग बेस्टमधून निवृत्त होत आहे. त्यांची देणी देण्यासाठी सुद्धा बेस्ट उपक्रमाला महापालिकेपुढे हात पसरावे लागत आहेत. सर्वच परिस्थिती खूप बिकट आहे. या बिकट परिस्थितीवर नव्या व्यवस्थापकांना मार्ग काढावा लागणार आहे. बेस्टचा गाडा सुरळीत करायचा असेल तर नव्या व्यवस्थापकांना मुंबई महापालिकेची मदत घेणे व त्या मदतीमधून स्व मालकीचा बस ताफा घेणे, कामगारांची भरती करणे, बेस्ट उपक्रमाचा अर्थसंकल्प पालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये विलीन करणे, बसगाड्यांचा वापर करून बस तिकिटाव्यतिरिक्त जाहिरातसारख्या अतिरिक्त स्तोत्रमार्फत महसूल वाढवणे, बेस्टच्या मोकळ्या जागांचा, बस स्थानकांचा व आगारांचा त्यांना न विकता, विकास करून बेस्टला आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे व योग्य ते व्यवस्थापन करून बेस्टला पूर्वीचे गतवैभव प्राप्त करून देणे आवश्यक ठरणार आहे. **- अल्पेश म्हात्रे.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णुपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.



## वारकऱ्यांना विहिरीतून पाणीपुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांचा सन्मान

**वेळापूर** : श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यासाठी आपल्या विहिरीतून पाणीपुरवठा करून समाजसेवे बरोबरच अथक पुण्याचे काम करणारे शेतकरी उत्तम देवकते, माणिकअण्णा चव्हाण, शंकरराव यादव, हणमंत मेहर, संदीप चंदनशिव, विठ्ठल पिंगळे, कल्याणराव चव्हाण पाटील, नागनाथ ज्योतीराम साळुंखे यांनी सहकार्य केल्याबद्दल त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्ह्याचे नेते तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक उत्तमराव जानकर यांच्या हस्ते प्रमाणपत्र, टोपी, उपरणे, हार घालून सर्वांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मार्केट कमिटीचे माजी संचालक दादासाहेब घाडगे, वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे, उपसरपंच तानाजीकाका चव्हाण, ग्रामविकास अधिकारी पांडुरंग ठवरे, माजी उपसरपंच जावेद मुलाणी, माजी ग्रामपंचायत सदस्य काशिनाथबापू आडत, ग्रामपंचायत सदस्य हनुमंत वायदंडे, नानासो मुंगुस्कर, तसेच महादेव म्हेत्रे, शंकर आडत, शिवाजी सावंत, चंद्रकांत पोळ, मोहन कचरे, जवान माने देशमुख, निवृत्ती भुसारे, अमोल पनासे, प्रवीण गायकवाड, दादा मदडे, कल्याण मदडे, विष्णू भानवसे आदी उपस्थित होते.

## निंबर्गी स्पॅन फौउंडेशन च्यावतीने मोफत बालरोग तपासणी

**दक्षिण सोलापूर** : दक्षिण सोलापूर तालुक्यातील निंबर्गी येथे कै. बसवराज धर्मराज बिराजदार यांच्या स्मरणार्थ मोफत बालरोग तपासणी व आरोग्य शिबिराचे आयोजन स्पॅन मेडिकल फाउंडेशन व रिचार्ज सेंटर व शिवसमर्थ क्लिनिक यांच्या संयुक्त विद्यमाने निंबर्गी प्राथमिक उपकेंद्र येथे करण्यात आले होते.यावेळी स्पॅन हॉस्पिटलचे बालरोगतज्ञ डॉ. सुकन्या ताढवणे डॉ. शुभम मुळे निंबर्गी प्राथमिक आरोग्य उपकेंद्राचे डॉ. दिपाली कोरे यांच्या उपस्थितीत आरोग्य शिंपीर संपन्न झाला. यावेळी निंबर्गी गावातील २५१ पेक्षा अधिक लोकांनी आरोग्य तपासणीचा लाभ घेतला. यावेळी गावातील प्राथमिक शाळा,रमाबाई आंबेडकर आश्रम शाळा तसेच अंगणवाडी येथील मुला-मुलींची ही आरोग्य तपासणी करण्यात आली यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चंद्रकांत गांगजी यांचे निधन



**सोलापूर** : क्षत्रिय गल्ली विठ्ठल मंदिर भजनी मंडळाचे अध्वर्यू वै. ह. भ. प. चंद्रकांत विठ्ठलसा गांगजी (वय ८१) यांचे बुधवारी दि. २१ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात २ मुले, १ मुलगी, सूना, नातवंडे, २ भाऊ असा परिवार आहे.

# विठुरायाच्या दर्शनाला येणार १८ लाख वारकरी!

## वारकऱ्यांसाठी ५ हजार बसगाड्यांची सोय

सुराज्य/सोलापूर

**पंढरीच्या पांडुरंगाच्या आषाढी वारीसाठी १६ ते १८ लाख वारकरी येतील, असा अंदाज पोलिस प्रशासनाचा आहे. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रासह राज्याच्या कानाकोपऱ्यातून पंढरीत येणाऱ्या वारकऱ्यांच्या सोयीसाठी पाच हजार बसगाड्यांची सोय केली आहे. स्थानिक पातळीवर सोलापूर विभागाच्या २५० गाड्या असतील.**

आषाढी यात्रेच्या नियोजनासाठी पंढरपुरात अधिकाऱ्यांची बैठक पार पडली आहे. त्यात वारकऱ्यांची गैरसोय होऊ नये, याकडे लक्ष देण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. एसटी प्रवाशांसाठी १८००२२१२५० हा टोल फ्रि हेल्पलाइन नंबर आहे. बसगाड्यांच्या वेळापत्रक त्यावरून समजणार आहे.

येत्या २९ जूनला आषाढी वारीचा सोहळा असून दरवर्षी पांडुरंगाच्या दर्शनासाठी महाराष्ट्रासह कर्नाटक व इतर राज्यातून २० लाखांपर्यंत भाविक पंढरीत दाखल होतात. पोलिस प्रशासन, राज्य महिला आयोग, आरटीओ, अशा वेगवेगळ्या विभागांच्या माध्यमातून वारकऱ्यांच्या अडचणींवर मात केली जात आहे. दरवर्षी पंढरीत येणाऱ्या वारकऱ्यांचा अंदाज घेऊन एसटी महामंडळाने ५



हजार बसगाड्यांची सोय केली आहे.मराठवाड्यातून येणाऱ्या बसगाड्या भीमा नगर बस स्थानकावर, खानदेशातून येणाऱ्या बस श्री विठ्ठल कारखान्यावरून, पुणे-सातारासह पश्चिम महाराष्ट्रातून येणाऱ्या बसगाड्या चंद्रभागा नगर येथून ये-जा करतील. स्थानिक पातळीवरील २५० अतिरिक्त गाड्या अक्कलकोट, तुळजापूर, मंगळवेढा, शिखर शिंगणापूर यासह गरजेच्या ठिकाणाहून धावतील.५ हजार बसगाड्यांसाठी दहा हजार चालक-वाहक व इतर विभागांचे अधिकाऱ्यांचा वॉच एसटी वाहतुकीवर असणार आहे.

### 'या' वारकऱ्यांना सवलतीचा प्रवास

शिंदे-फडणवीस सरकारने काही महिन्यांपूर्वी एसटी बसगाड्यातून प्रवास करणाऱ्या महिलांना ५० टक्के सवलत देण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे आता आषाढी वारीसाठी येणाऱ्या महिला वारकऱ्यांना अर्ध्या तिकिटात पंढरीत दाखल होता येणार आहे. दुसरीकडे ६५ वर्षांवरील ज्येष्ठांना केवळ आधारकार्ड किंवा मतदान कार्ड दाखवून मोफत प्रवास करता येणार आहे. त्यामुळे यंदा महिला व ज्येष्ठ वारकऱ्यांची संख्या अधिक असेल, असा अंदाज एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

### सहा हजारांहून अधिक पोलिसांचा बंदोबस्त

आषाढी वारीला येणाऱ्या भाविकांचा अंदाज घेऊन यंदा सहा हजारांहून अधिक पोलिसांचा बंदोबस्त पंढरीत असणार आहे. सातारा, पुणे, कोल्हापूर, सांगली यासह इतर काही ठिकाणाहून देखील बंदोबस्त मागविला आहे. पोलिसांच्या मदतीला जवळपास एक हजार होमगार्ड असतील. पोलिस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथके देखील वारी काळात नेमली जाणार आहेत.

# उद्योग बंद पाडून विमानसेवा सुरू करण्यात अर्थ काय?

### फारूक शाब्दी यांचा सवाल

सुराज्य/सोलापूर



शहराच्या विकासासाठी विमान सेवा झाली पाहिजे पण एखादा चांगला चाललेला उद्योग बंद करून विमान सेवा सुरू करण्यात काहीही अर्थ नाही महापालिकेने कोणाच्या दबावापोटी अशा कारवाया करू नये अन्यथा इतर उद्योग सोलापुरात येणे अवघड होईल, असे प्रतिपादन एमआयएमचे शहराध्यक्ष फारुख शाब्दी यांनी केले.

सिध्देश्वरसाखरकारखान्याची चिमणी पाडण्यात आली. त्याचा निषेध करत फारुख शाब्दी यांनी गुरुवारी धर्मराज काडादी यांची भेट घेऊन त्यांना पुढील काळात सहकार्य करण्याचे आश्वासन दिले त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. शाब्दी पुढे म्हणाले की, चिमणी पाडल्यामुळे हजारो कामगार आणि शेतकऱ्यांचे नुकसान होणार आहे. सिद्धेश्वर कारखाना आज राज्यातील नावाजलेला कारखाना आहे. हा कारखाना बंद पाडून कामगारांना देशोधडीला लावून विमानसेवा सुरू करण्यात काहीही अर्थ नाही. विमान सेवा शहरासाठी गरजेची आहे. मात्र कारखाना ही महत्त्वाचा आहे. त्यामुळे शासनाने आता हा कारखाना सुरू करण्यासाठी मदत करावी. संपूर्ण एमआयएम पक्ष काडादी यांच्या बाजूने आहे. त्यांना कोणतीही मदत लागल्यास आम्ही तयार आहोत. महापालिकेनेही यापुढे कोणाच्या दबाव पोटी कारवाई करू नये. अशा कारवाया केल्यास शहरात कोणतेही उद्योग भीतीने येणार नाहीत, याचा विचार करणे आवश्यक असल्याचेही शाब्दी म्हणाले. यावेळी गाजी जहागीरदार, कोमारो सय्यद, मोहसीन मैंदर्गीकर, वाहिदा भंडाले जुबेर शेख, अशपाक बागवान जमीर शेख, सत्तार शेख, जावेद शेख यांची उपस्थिती होती.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## ई-निविदा सूचना

सोलापूर शहर विभागांतर्गत पी. सी. झिरो (PC-0) च्या ग्राहकांचे मीटर रिडींगच्या (Up to 20 KW) कामाकरिता अनुभवी ठेकेदारांकडून ई- निविदा EE/SUR/U/T-**०३/२०२३-२४**, (निविदा किंमत- ४३.६२ लाख रुपये) ही ई-निविदा ऑनलाईन मागविण्यात येत आहे. निविदा विक्री दि. २३.०६.२०२३ ते ०२.०७.२०२३ पर्यंत असून निविदा सादर करण्याची अंतिम दि. ०३.०७.२०२३ दु. ११:०० वाजेपर्यंत राहील. सदर तपशील महावितरण कंपनीच्या अधिकृत http://works.mahadiscom.in/eTender/etender संकेतस्थळावर उपलब्ध राहतील. सदरील निविदा स्वीकारणे/ नाकारणे अथवा रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार निम्न स्वाक्षरीदाराकडे राहतील.

कार्यकारी अभियंता,
सोलापूर शहर

पीआरओ क्र.- BMTZ/ 053 /2023-24

## जाहीर प्रसिद्धीकरण

क्रि.कि.अ.नं.१२६/२०२३

### बार्शी येथील मे.ज्यु.मॅ.वर्ग - १ सो यांचे कोर्टात

**सौ.सोनाली शाम कसबे,**
वय - २८, धंदा-घरकाम, रा.ईट, ता.भूम, जि.उस्मानाबाद - **अर्जदार**

**विरूद्ध**

**मा.ग्रामसेवक,**
**मांडेगांव ग्रामपंचायत, मांडेगांव** - **सामनेवाला**

**अर्ज-जन्म मृत्यू कायदा १९६९चे कलम १३(३) प्रमाणे**

ज्याअर्थी, यातील अर्जदाराचा मुलगा अंकित शाम कसबे यांचा जन्म दि.२१/०३/२०१९ रोजी मौजे मांडेगांव, ता.बार्शी येथे झालेला होता व आहे. अर्जदाराचा मुलगा अंकित शाम कसबे याच्या जन्माची नोंद मांडेगांव ग्रामपंचायत, मांडेगांव यांचे जन्म-मृत्यू रजिस्टरला होण्याबाबत अर्जदाराने सदरील अर्ज मे.कोर्टात दाखल केलेला आहे. त्याअर्थी, वर नमूद अर्जदाराचा मुलगा अंकित शाम कसबे याच्या जन्माबाबत कोणाची काही हरकत तक्रार असल्यास त्यांनी सदरे नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत अगर नेमलेली तारीख दि.०५/०७/२०२३ रोजी या कामी मे.कोर्टात सकाळी ११.०० वा हजर राहून कागदपत्रानिशी आपले म्हणणे अगर हरकत द्यावी अथवा कोणाचेही काही म्हणणे/ हरकत न आल्यास सदरील अर्जदारांना त्यांच्या मुलाच्या जन्माची नोंद मांडेगांव ग्रामपंचायत, मांडेगांव यांचे जन्म मृत्यू रजिस्टरला नोंद करण्याबाबत योग्य ते आदेश देण्यात येतील कळावे, हे जाहीर प्रसिद्धीकरण दिले. ता.१९/०६/२०२३

**सही/-**
**क.लिपिक**

शिक्का

**सही/-**
**सहा.अधीक्षक**
**फौजदारी न्यायालय क.स्तर बार्शी**

## नाना पटोले आज सोलापुरात

**सोलापूर** : काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले शुक्रवारी सोलापुरात येत आहेत.



सकाळी ७.३० सिद्धेश्वर एक्सप्रेस ने सोलापुरात आगमन होणार आहे. ९ ते ४ वाजेपर्यंत तुळजापूर, अक्कलकोट दौरा संध्याकाळी ५ ते ६ वाजता श्री सिद्धेश्वर साखर कारखान्याचे माजी चेअरमन धर्मराज काडादी त्यांच्या निवासस्थानी भेट. रात्री शासकीय विश्रामगृह येथे मुक्काम. शनिवारी माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या समवेत दौरा, ७ वाजता वाजता सराटी (पुणे) अकलूज (सोलापूर) नदी पूल येथे सोलापूर जिल्हा प्रवेश स्वागत. तुकाराम महाराज पालखी मध्ये पायी वारीत सहभाग, अकलूज वरून मोटारीने पुरदांवडेकडे प्रस्थान, दुपारी १२.३० वा. ज्ञानेश्वर माऊली अश्वाचे गोलरिंगण सोहळा उपस्थिती व ज्ञानेश्वर माऊली पादुका दर्शन, दुपारी ३.३० वा. शाळेच्या इमारतीचे भूमिपूजन स्थळ धवलनगर, शंकरनगर, यशवंतनगर, ५ ते ७ वाजता काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ता भेटीगाठी व आढावा राखीव, असा त्यांचा दौरा आहे.

# वाखरी येथे पिकअपमध्ये जनावरांच्या चाऱ्याआड लपवून ठेवलेली गोवा दारु जप्त

## पिकअपसह नऊ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

सुराज्य/पंढरपूर

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पंढरपूरच्या पथकाने बुधवारी (ता. २१) वाखरी गावाच्या हद्दीत एका पिकअप वाहनातून दीड लाखांची गोवा राज्य निर्मित विदेशी दारु जप्त केली.

राज्य उत्पादन शुल्क पंढरपूर विभागाचे निरिक्षक किरण बिरादार यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे त्यांनी बुधवारी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास वाखरी (ता. पंढरपूर) गावाच्या हद्दीत वाखरी-गादेगाव रोडवर सापळा रचून एका वापरत्या अशोक लेलँड कंपनीच्या चारचाकी पिकअप वाहन क्र MH ४२ BF २६७१ चा पाठलाग केला असता वाहनचालक गाडी सोडून फरार झाला. निरिक्षक पंढरपूर यांनी सदर वाहनाची झडती घेतली असता जनावराच्या चाऱ्याआड विदेशी दारूच्या पेट्या लपवून ठेवल्याचे दिसून आले. या गुन्ह्यात एक लाख छप्पन हजार किंमतीची दारु व पिकअप वाहन असा एकूण नऊ लाख सहा हजार किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**आवाहन :-** आषाढी वारीच्या अनुषंगाने राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून विशेष पथके नेमण्यात आली असून अवैध दारु विक्री, निर्मिती, वाहतुकीवर करडी नजर ठेवण्यात येत आहे. तसेच सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही ठिकाणी अवैध हातभट्टी दारु निर्मिती / वाहतूक / विक्री/ साठा, बनावट दारु, परराज्यातील दारु याबाबत माहिती मिळाल्यास या विभागास संपर्क साधावा.




ही कारवाई राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक नितीन धार्मिक यांच्या मार्गदर्शनाखाली निरिक्षक किरण बिरादार, सहायक दुय्यम निरिक्षक जीवन मुंढे, जवान गणेश रोडे, गजानन ढब्बे व वाहनचालक रामचंद्र मदने यांनी पार पाडली.

# अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे यांना केले कार्यमुक्त

## महापालिका आयुक्त तेली-उगले यांनी काढले आदेश

सुराज्य/सोलापूर

महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे यांना कार्यमुक्त करण्याचे आदेश महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी काढले आहेत. दरम्यान, खोराटे यांची सेवा प्रत्यार्पित करण्याबाबत नगर विकास विभागाच्या प्रधान सचिवांना महापालिका आयुक्तांनी पत्राद्वारे कळविले आहे.

सोलापूर महापालिकेत विजय एकनाथ खोराटे यांची अतिरिक्त आयुक्त या पदावर नियुक्ती करण्यात आलेली होती. अतिरिक्त आयुक्त खोराटे यांचा कार्यकाल संपत असल्याने त्यांच्या जागी अन्य अधिकाऱ्याची नेमणूक होण्याकरिता त्यांना सोलापूर महानगरपालिका येथून दि. २१ जून २०२३ रोजीच्या मध्यानोत्तर सोलापूर महानगरपालिकेच्या सेवेतून कार्यमुक्त करणेत येत आहे व त्यांची सेवा शासनाकडे प्रत्यार्पित करणेत येत आहे, असे महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी आदेशात म्हटले आहे. दरम्यान, खोराटे यांची सेवा प्रत्यार्पित करण्याबाबत नगर विकास विभागाचे प्रधान सचिवांना आयुक्तांनी पत्राद्वारे कळविले आहे. खोराटे यांची सोलापूर महानगरपालिकेत दि. २४



जून २०२० पासून अतिरिक्त आयुक्त या पदावर शासनाकडून नेमणूक करण्यात आली. दिनांक २९ जून, २०२० पासून सोलापूर महानगरपालिकेमध्ये ते अतिरिक्त आयुक्त या पदावर कार्यरत होते. त्यांचा कार्यकाल संपत असल्याने त्यांच्या जागी अन्य अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात यावी. त्यांची सेवा शासनाकडे प्रत्यार्पित करण्यात येत आहे, असे म्हटले आहे. अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे यांच्याकडे सोलापूर महापालिकेतील विविध महत्त्वाच्या विभागाची जबाबदारी देण्यात आली होती.

## निराश पतीने केला विष पिऊन आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर** : माहेरी गेलेली पत्नी नांदण्यास येत नसल्याचे पाहून निराश झालेल्या तरुणाने शेतातील मंदिरासमोर विष पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला . ही घटना गलंदवाडी (ता.मोहोळ) येथे गुरुवारी दुपारच्या सुमारास घडली. नामदेव श्रीकांत शेंबडे (वय २८ रा. गलंदवाडी) असे विष प्राशन केलेल्या तरुणाचे नाव आहे. आज दुपारी एक वाजेच्या सुमारास त्याने शेतातील सटवाई मंदिरासमोर विष प्राशन केला होता. त्याला उपचारासाठी श्रीकांत (वडील) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्याची पत्नी माहेरी गेली. तिला नांदविण्यास पाठवत नसल्याने तो निराश झाला होता. त्यातून त्याने हा प्रकार केला, अशी नोंद तालुका पोलिसात झाली.

## महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११
### (महाराष्ट्र शासन अंगिकृत व्यवसाय)

कार्यकारी अभियंता, उजनी कालवा विभाग क्रमांक ८,
सोलापूर यांचे कार्यालय
सिंचन भवन, गुरुनानक चौक, क्लब कँटीन जवळ, सोलापूर
दूरध्वनी क्रमांक-०२१७-२७३२८५३
ई-मेल -ucd8.solapur@gmail.com

### ई निविदा सूचना क्रमांक १ सन २०२३-२४ (ऑनलाईन)

कार्यकारी अभियंता, उजनी कालवा विभाग क्र.८, सोलापूर हे महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ पुणे यांच्या वतीने सक्षम कंत्राटदारांकडुन खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवण्यात येत आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नांव | जिल्हा | निविदेची अंदाजित रक्कम रू.लक्ष |
|---|---|---|---|
| १. | देगांव उपसा सिंचन योजना सा.क्र.२७/७७५ येथे फोरबे, पंपगृह स्विचयार्ड, मॅनिफोल्ड, उर्ध्वगामी नलिका व वितरणकुंड बांधणे. | सोलापूर | १५५०१.६७ |

१. ई-निविदा उपलब्ध कालावधी :- दि.२३.०६.२०२३ ते दि. १३.०७.२०२३
२. जिओटॅगींग उपलब्ध कालावधी:- दि.२६.०६.२०२३ ते दि. ३०.०६.२०२३
३. निविदा उघडणे :- दि. १४.०७.२०२३ रोजी शक्य असल्यास किंवा त्यापुढे खालील संकेतस्थळावर ई-निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.
४. ई-निविदा संबंधी काही अतिरिक्त माहितीसाठी वरील संकेतस्थळावर तसेच संबंधीत हेल्पडेस्क २४/७ टोल फ्री वर संपर्क साधावा.
५. निविदा सूचनेबाबतची सविस्तर माहिती व इतर माहितीसाठी खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
(सदर नोटीस मध्ये काही बदल झाल्यास खालील संकेतस्थळावर सुचित करण्यात येईल)

Main Portal : https://mahatenders.gov.in

जा.क्र. उकावि-८/निविदा/२९४२/२०२३
उजनी कालवा विभाग क्र.८,
सोलापुर दि. १६/०६/२०२३

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**उजनी कालवा विभाग क्र.८,**
**सोलापूर**

DGIPR-ROC-2023-24-5-C1627

# राज्य सरकारला ठाकरे गट अल्टीमेटम

# दूध धोरण जाहीर करा अन्यथा महाराष्ट्र बंद : हाके

सुराज्य/सोलापूर

राज्यातील दुध उत्पादक आणि शेतकऱ्यांसाठी दुध धोरण जाहीर करावे .या मागणीसाठी शिवसेना ठाकरे गट आक्रमक झाला आहे. शिंदे- फडणवीस सरकारला दहा दिवसाचा अल्टीमेट दिला आहे. आषढीनंतर दुध धोरणाचा निर्णय घ्यावा ,अन्यथा आषढीवारी झाल्यानंतर सरकारच्या विरोधात तीव्र आंदोलन उभे करत महाराष्ट्र बंद केला जाईल. त्यामुळे पंढरपुरात विठ्ठलाच्या महापुजेला येताना मुख्यमंत्र्यांनी येता धोरणात्मक निर्णय घेऊन यावे, असा इशारा शिवसेनेचे प्रवक्ते तथा महाराष्ट्र मागासवर्गीय आयोगाचे सदस्य लक्ष्मण हाके यांनी सोलापूरात पत्रकार परिषदेत दिला.

राज्यामध्ये दुध व्यवसाय हा शेतीचा जोडधंदा म्हणून केला जातो. लंम्पी रोग आणि कोरोना-१९ महामारी, लॉकडॉऊन नंतर दुध व्यवसाय उभारी घेत असतांना महाराष्ट्रातील दुध संघानी दुधाचे दर अचानक कमी केले आहेत. एका बाजुला पशुखाद्य, पशु वैद्यकीय सेवा, यांचे दर दुप्पट होत आहेत. दुधाचे दर कमी करून दुधसंघ नफेखोरी करत आहे. दुध संकलन करणाऱ्यांवर कोणाचे नियंत्रण नाही. त्यामुळे शिवसेना हा प्रश्न घेऊन रस्त्यांवर येणार आहे. गाईच्या दुधाला ४० व म्हशीच्या



दुधाला ६० रुपये भाव वाढ देण्याची मागणी हाके यांनी यावेळी केली.तसेच राज्यसरकारने कर्नाटकच्या नंदिनी आणि गुजतरात च्या अमुल ब्रॅन्डच्या धरतीवरती महाराष्ट्र शासनाने एक ब्रॅन्ड निर्माण करावा आणि ना नफा ना तोटा या धरतीवर दुग्ध व्यवसाय वाढीचा धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा अशी मागणी शिवसेनेच्यावतीने करण्यात आली. दुध दरवाढीचा निर्णय मान्य नाही झाला तर प्रत्येक जिल्हात शिवसेनेच्या वतीने ठिय्या आंदोलन, मोर्चा, असे तीव्र आंदोलन केले जाणार आहे. या निर्णय आषढी वारी पर्यंत घ्यावा अन्यथा विधानभवनावर मोर्चा आणि महाराष्ट्र बंद केला जाईल असा इशारा देखिल यावेळी दिला.

पत्रकार परिषदेला जिल्हाप्रमुख पुरुषोत्तम बरडे, धनंजय डिकोळे, संभाजी शिंदे ,गणेश वानकर, अमर पाटील, यांच्यासह राज्य विस्तारक शरद कोळी,अतुल भंवर, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख बालाजी चौगुले, विक्रांत काकडे ,पुजा खंदारे, संतोष केंगनाळकर, मोहसीन शेख, माणिक श्रीरामे, नारायण गोवे, तुकाराम भोजने, अशोक भोसले आदी उपस्थित होते.

# सेतू बंद; निविदेचा पत्ता नाही; ई महासेवा केंद्रांवर नागरिकांची आर्थिक लूट

सुराज्य/सोलापूर

दहावी बारावीचा निकाल लागला आहे. महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी लागणारे विविध दाखले मिळवण्यासाठी पालक आणि विद्यार्थ्यांची धावपळ चालू आहे. दाखल्यासाठी ई महासेवा केंद्रावर मोठी गर्दी पडत आहे. सेतू केंद्र बंद असल्यामुळे मोठ्या अडचणींचा समाना नागरिकांना करावा लागत आहे. जिल्हाप्रशासनाकडून सेतूची निविदा काढण्याचा निर्णय घेतला मात्र निविदा काढण्याबाबत कोणत्याच हालचाली जिल्हाप्रशसनामध्ये दिसत नाहीत. यांचा फायदा ई महासेवा केंद्रवाले घेत आहेत. जादा दराची अकारणी करत नागरिकांची आर्थिक लूट केली जात आहे. जिल्हा प्रशासनाच्या वतीने गेल्या काही दिवसांपासून जिल्हाधिकारी कार्यालयासह तालुका पातळीवरील सेतू कार्यालये बंद केली आहेत. त्यामुळे विविध दाखले आणि सेवा मिळविण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांची ससेहोलपट सुरू झाली आहे.




या ई –महासेवा केंद्रांवर कोणाचाही कोणाचेही नियंत्रण नाही .मनमानी पद्धतीने कारभार चालू आहे. नागरिकांची आणि विध्यर्थांच्या आर्थिक लूट कोणाचे लक्ष नही जिल्हाप्रशासनातील अधिकारी करतात तरी काय असा सवाल सर्व सामान्य जनता विचारत आहे.

दहावी बारावीचा निकाल लागला आहे. त्यामुळे नव्या शैक्षणिक वर्षाला सुरुवात झाली आहे. प्रवेशासाठी लागणाऱ्या कागदपत्रांसाठी सर्व महाईसेवा केंद्रावर मोठी गर्दी पडली आहे. सेतू कार्यालयात ३० ते ३५ रूपयात मिळणारे जातींचे दाखले, उत्पन्नाचे दाखले, रहिवासी दाखले, नॉनक्रिमिलेअर, प्रतिज्ञापत्रे, साठी आता चक्क दोनशे तीनशे रूपये मोजावे लागत आहेत. ग्रामिण भागात तर मोठ्या प्रमाणात लूट चालू आहे. दाखला तात्काळ पाहिजे असल्यास त्यांचा दर वेगळा आहे.

सेतू कार्यालय नव्याने चालू करण्यासंदर्भात प्रशासनाने हालचाली केल्या आहे. लवकरच निविदा काढून सेतू कार्यालय सुरू करण्यात येणार असल्याचे प्रभारी जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांनी सांगितले आहे. मात्र आद्याप निविदेचा पत्ता नाही प्रशासकाडून सेतूची निविदा काढण्याबाबत कोणत्याही चालचाली दिसत नाहीत. यांचा फायदा ई महासेवा चालक घेत आहेत.

सेतू कार्यालयात दाखल्यासाठी अर्ज केल्यानंतर तीन दिवसांमध्ये दाखले मिळत होते. मात्र ई - महासेवा केंद्र मध्ये अर्ज दाखल केल्या नंतर दाखला मिळवण्यासाठी तब्बल १५ ते २० दिवसांचा कालावधी लागत आहे. यामुळे महाविद्यालय प्रवेश प्रक्रियेसाठी मोठ्या अडचणी येत असल्याच्या पालक आणि विद्यार्थ्यांच्या तक्रारी आहेत. ई-महासेवा केंद्रामध्ये होणारी आर्थिक लूट लक्षात घेता सर्वसामान्यांना नागरिकांना सेतू कार्यालय पुन्हा चालू मागणी जोर धरू लागली आहे.

# तीन परिमंडळातील पुरवठा निरीक्षकांना तपासणीसाठी मुहूर्त सापडेना

## तपासणीचे बालंट थांबविण्यासाठी दुकानदारांची धावपळ

सुराज्य/सोलापूर

शहरातील चारही परिमंडळ विभागातील ५१ रेशन दुकानांच्या तपासणीचे आदेश असताना ब परिमडळ विभागाने दुकानांची तपासणी सुरू करण्यात आली आहे. इतर तीन परिमंडळातील पुरवठा निरीक्षकांना तपासणीसाठी अद्याप मुहूर्त सापडला नाही. मात्र प्रशासनाच्या तपासणी मोहिमेमुळे धास्तावलेले रेशन दुकानदार तपासणीचे बालंट टाळण्यासाठी धावपळ करत आहे.

प्राधान्य कुटुंब व अंत्योदय लाभार्थी योजनेतील गरीब शिधापत्रिकाधारकांना शासनाने मोफत धान्य देण्यास सुरुवात केली आहे. अनेक ठिकाणी गरिबांना हे धान्य मिळत नसल्याच्या तक्रारी वाढल्याने अन्नधान्य वितरण अधिकारी सुमित शिंदे यांनी अ, ब, क व ड परिमंडळातील ५१ रेशन दुकाने तपासणी करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी त्यांनी पुरवठा निरीक्षकांची तपासणी पथकेही नियुक्त केली आहेत. त्यानुसार ब परिमंडळातील रेशन दुकानांची तपासणी व धान्याची झाडाझडती घेण्यास क विभागातील नियुक्त पुरवठा निरीक्षक राजेश यमपुरे यांनी सुरूवात केली आहे. आतापर्यंत त्यांनी चार पाच दुकाने तपासली आहेत. परंतु अ, क आणि ड परिमंडळात अद्याप तपासणीस प्रारंभ झाला नाही.

यापूर्वी आमदार प्रणिती शिंदे यांनी गरिबांना धान्य मिळत नसल्याची तक्रार जिल्हाधिकारी व अन्नधान्य वितरण अधिकार्यांकडे केली होती. तेव्हाही अशाच पध्दतीने नायब तहसीलदारांच्या नेतृत्वाखाली पथके नियुक्त करून दुकानांची तपासणी करण्यात आली होती. यामुळे काही महिने दुकानदारांना चाप लागला होता. आता पुन्हा त्यांनी डोके वर काढले असून गरिबांचे हक्काचे धान्य लुटण्याचे प्रकार सुरू झाले आहेत. या पार्श्वभूमीवर अन्नधान्य वितरण अधिकार्यांनी तपासणीचे आदेश दिले आहेत. दरम्यान, ही कारवाई थांबविण्यासाठी काही दुकानदारांनी लोकप्रतिनिधी व रेशन दुकानदार संघटनेकडे दबावतंत्राचा वापर सुरू केला आहे.

## मृत्यूस कारणीभूत; टेम्पो चालकावर गुन्हा

सोलापूर : स्वताच्या ताब्यातील टेम्पो हयगयीने चालवून धडक दुचाकीवरील दोघांना धडक दिल्याने त्याचा मृत्यू झाल्याप्रकरणी टेम्पो चालकावर गुन्हा दाखल झाला आहे. या बाबत सलगरवस्ती पोलिसांनी फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून मुझफ्फर राजेसाब हवालदार (वय-२७, रा.सबगाव,बेळगाव) याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. आरोपी मुझफ्फर हा १८ जून रोजी बेलाटी येथील विजापूर ते केगाव कडे जाणार्या रोडवरून टेम्पो घेऊन जात होता. त्याच्या टेम्पोत दाटी वाटीने म्हशी भरून घेऊन तो हयगयीने व निष्काळजीपणाने चालवत जात होता. त्यावेळी त्याने समोरील दुचाकीवरील विरेश बालाजी कागे ( वय २७), सखुबाई राम कागे ( वय ७०, रा. गुरू राघवेंद्र नगर, मोमीन नगर) यांना धडक दिली. या धडकेत विरेश व सखूबाई कागे यांचा मृत्यू झाला. तर किन्नर महिबूब वाहनातील म्हशी तसेच स्वताच्या जखमी होण्यास कारणीभूत ठरल्याप्रकरणी मुझफ्फर हवालदार यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा तपास सपोनि शेख करत आहेत.

## पत्नीच्या चारित्र्यावर संशय ; पतीसह तिघांवर गुन्हा

सोलापूर : चारित्र्यावर संशय घेत पत्नीचा छळ केल्याप्रकरणी पतीसह तिघांवर जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत आयशा तजीन अहमद पठाण (वय-२४, रा.तेलंगी पाच्छा पेठ) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी आयशा यांचे आरोपी पती तजीन अहमद पठाण याच्यासोबत २०२१ मध्ये विवाह झाला होता. तेव्हापासून आरोपीचे कुटुंबिय हे संगणमत करून फिर्यादीला शिवीगाळ करत अपमानित करत होते.शिवाय त्यांना शारीरिक व मानसिक त्रास देत होते.तसेच फिर्यादीच्या चारित्र्यावर संशय घेत मुलीस स्विकारण्यास नकार देऊन नांदवण्यास नकार दिला. अशा आशयाची फिर्याद आयशा पठाण यांनी दिली आहे. या फिर्यादीवरून पती तजीन पठाण, सासू मेहरूनिसा अय्युब पठाण, सासरे अय्युब पठाण (सर्व रा.अकलूज) यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा तपास मस्के करत आहेत.

## लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार; तरुणावर गुन्हा

सोलापूर : लग्नाचे आमिष दाखवून पीडितेवर वारंवार अत्याचार केल्याप्रकरणी तरुणावर गुन्हा दाखल झाला आहे.याबाबत पीडितेने फिर्याद दिली आहे. अत्याचार प्रकरणी कादर सैदु हांडे (रा.कुमठा नाका) याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

काही दिवसापूर्वी पीडितेची आरोपीशी ओळख झाली होती. त्या ओळखीतून दोघे एकमेकांना फोनमधून बोलत होते. दरम्यान, आरोपीने पीडितेला लग्न करण्याचे आमिष दाखविले. त्यानंतर त्याने पीडितेला जेवण्यासाठी जाऊ असे सांगून तिला आपल्या दुचाकीवरून लॉजवर नेत अत्याचार केला. त्यानंतर ही त्याने पाच ते सहा वेळा अशाच प्रकारे अत्याचार केला. त्यानंतर पीडितेने लग्नाबाबत विचारल्यानंतर आरोपी कादर हांडे याने लग्नास नकार दिला. याप्रकरणी आरोपीवर अत्याचाराचा गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा तपास पोलिस करत आहेत.

## दहा लाखांसाठी पत्नीचा छळ ; पतीसह सहा जणांवर गुन्हा दाखल

सोलापूर : घरात राहायचे असेल तर घर बांधण्यासाठी माहेरून १० लाख रूपये घेऊन ये म्हणत पत्नीचा छळ केल्याप्रकरणी पतीसह सहा जणांवर सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.याबाबत सुकन्या रतनकुमार कांबळे (वय-३२,रा. संजय नगर,कुमठा नाका) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी सुकन्या यांचे आरोपी रतनकुमार याच्यासोबत २०२२ मध्ये विवाह झाला होता.विवाहानंतर पती रतनकुमार, दीर महादेव कांबळे, उध्दव कांबळे, पतीची आत्या अंजीरा सोनकांबळे, नातेवाईक सुजाता सोनकांबळे, सतीश गायकवाड या सर्वांनी पीडितेला वारंवार मानसिक त्रास दिला.शिवाय इथे रहायचे असेल तर घर बांधण्यासाठी माहेरून दहा लाख रूपये घेऊन ये म्हणत त्रास देत होते. याप्रकरणी वरील सहा जणांवर गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा तपास वाडीकर करत आहेत.

## डब्ल्यू. आय. टी. चे प्रा. कुलकर्णी यांना पीएच. डी. प्रदान

सुराज्य/सोलापूर



वालचंदइन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजीच्या सिव्हील इंजिनियरिंग विभागातील प्रा. सुनिल केशव कुलकर्णी यांना पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर विद्यापीठाकडून पीएच. डी. पदवी प्रदान करण्यासाठी आली आहे.

शीयर स्ट्रेंथ ऑफ फायबर रेनफोर्स कॉँक्रिट डीप बीम्स' या विषयावर विद्यापीठात संशोधन प्रबंध सादर केला होता. यासाठी त्यांना डॉ. शशिकांत हलकुडे यांचे मोलाचे मार्गदर्शन झाले. त्यांच्या यशाबद्दल वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी, विश्वस्त श्री भूषण शहा, पराग शहा, प्राचार्य डॉ. व्ही. ए. आठवले यांच्यासह सर्व विभागप्रमुखांनी अभिनंदन केले.

## तीन महिन्यात विमानसेवा सुरु करणार; सोलापूर विचार मंच

सुराज्य/सोलापूर

विमानसेवेसाठी अथडळा ठरणारी सिध्देश्वर साखर कारखान्याची वादग्रस्त चिमणी सोलापूर विकास मंचच्या रेट्यामुळे आणि पाठपुराव्यामुळे १५ जून रोजी जमीनदोस्त झाली. यामुळे होटगी रोडवरील प्रवाशी विमानसेवेचा मोठा आणि प्रमुख अडथळा दूर झाला आहे. आता सोलापूरच्या विमानसेवेचा मार्ग मोकळा झाला असून ही विमानसेवा प्रशासकिय पातळीवरील परवाने मिळाल्यानंतर येत्या तीने महिन्यात सुरु होईल, असा आशावाद आणि दावा सोलापूर विकास मंचचे डॉ. संदीप आडके यांनी पत्रकार परिषदेत केला.

भारतीय विमान प्राधिकरणाकडून उडान योजनेअंतर्गत सोलापुरातून विमान सेवा सुरू करण्याच्या हालचाली सुरू झालेल्या आहेत. सोलापूरच्या सुसज्ज असणाऱ्या होटगी रोड विमानतळावरून येत्या तीन महिन्याच्या आत नागरी विमान सेवा सुरू होणार आहे.

कारखान्यानी को-जनरेशनची चिमणी पडल्यामुळे कारखान्याच्या गाळापवर कोणताही परिणाम होणार नाही व पुढील हंगामात ५००० मेट्रिक टन गाळप हा कारखाना आपल्या पूर्वीच्या दोन चिमण्यांवर सक्षमरित्या करू शकतो.

सिद्धेश्वर कारखाना जवळपास २०० कोटी नुकसानीत आणला असून, आपल्या कारखान्याला १००० कोटी देणेबाकी करून ठेवली आहे. त्याचमुळे १५०० कोटी नुकसान झाल्याची अफवा पसरवली जात आहे. आज नवीनच कारखाना ५०० कोटी रुपयात उभा राहतो मग या बाकीच्या पैशांच्या आफरातफरीचे काय व त्यास कोण जबाबदार?, असा सवाल डॉ. आडके यांनी केला आहे.


हा कारखाना आमच्या ताब्यात दिला तर आम्ही येत्या हंगामापासून तो चालवुन दाखवू असे कारखान्याचे माजी तज्ञ संचालक व सोलापूर विचार मंचचे संजय थोबडे यांनी सांगितले आहे.

होटगी रोड विमानतळावर बहुतांश सर्व सोयी उपलब्ध असून सोलापूर विमानतळाची सध्याची धावपट्टी ही २.१ किलोमीटरची असून त्यावरून ७२ आसनी आर टी आर विमाने सेवा देतील. मंचतर्फे नागरी उद्यन मंत्रालय, डीजीसीए व एअरपोर्ट ऑथॉरिटी ऑफ इंडिया ला तातडीचे ईमेल करून येथून पहिल्या टप्प्यात मुंबई, दिल्ली, हैदराबाद, बेंगलोर, चेन्नई व तिरुपती अशा ठिकाणी विमान सेवा सुरू करावी अशी विनंती करण्यात आली आहे.

## अशोक चौक परिसरात तरुणाला बांबूने मारहाण

सुराज्य/सोलापूर

अशोक चौक परिसरात मित्रासोबत चहा पिण्यासाठी फिर्यादी शशिकांत सुरेश शिंदे ( वय २१, रा. महात्मा झोपडपट्टी, अशोक चौक) हे जात असताना त्यांना आरोपी लखन मच्छिंद्र दांडगे ( वय २८, रा. अशोक चौक) याने पाठीमागून येऊन बांबूने फिर्यादीच्या मानेवर व खांद्यावर मारून जखमी केले. याप्रकरणी शिंदे यांच्या फिर्यादीवरून आरोपी लखन दांडगे याच्यावर जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना २० जून रोजी घडली.




## कल्पना व प्रतिभेला वाव देत तरुणांनी उद्योजकतेकडे वळावे : डॉ. जयंत कुलकर्णी

### सोलापूर विद्यापीठात स्किलॅथॉन स्पर्धेचे पारितोषिक वितरण

सुराज्य/सोलापूर

आज युवा विद्यार्थ्यांच्या मनात प्रतिभाशाली विचार, कल्पना आणि प्रतिभांचा वावर मोठा आहे. या प्रतिभा आणि कल्पनांना वाव देत तरुणांनी इनक्युबेशन सेंटरच्या माध्यमातून उद्योजकेकडे वळून उज्वल करिअर करावे, असे आवाहन रामभाऊ म्हाळगी प्रबोधनी, मुंबईचे कार्यकारी संचालक डॉ. जयंत कुलकर्णी यांनी केले.

गुरुवारी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या मुख्य सभागृहात इनक्युबेशन सेंटर, कौशल्य विकास विभाग, जिल्हा कौशल्य, रोजगार व स्वयंरोजगार केंद्र आणि जिल्हा व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण केंद्र यांच्यातर्फे आयोजित करण्यात स्किलॅथॉन- २०२३ स्पर्धेचे पारितोषिक वितरण प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. कुलकर्णी हे बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. गौतम कांबळे हे होते. याप्रसंगी व्यासपीठावर जिल्हा कौशल्य रोजगार केंद्राचे सहायक आयुक्त सचिन जाधव, राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा. देवानंद चिलवंत, कौशल्य विकास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रभाकर कोळेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत करताना इनक्युबेशन सेंटरचे संचालक डॉ. सचिन लड्डा यांनी इनक्युबेशन सेंटरच्या वतीने राबवण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

प्र-कुलगुरू डॉ. कांबळे यांनी विद्यार्थ्यांना नवीन गोष्टी व कल्पनांचा विचार करण्यास इनक्युबेशन सेंटरची खूप मोठी मदत होत आहे. या सेंटरच्या माध्यमातून संपूर्ण जिल्ह्यात चांगले उपक्रम राबविण्यात आले. आता यापुढे देखील विद्यार्थ्यांना उद्योजकतेकडे वळवण्यासाठी 'इनक्युबेशन वारी- आपल्या दारी' हा उपक्रम राबविण्याची घोषणा त्यांनी यावेळी केली.

स्किलॅथॉन या स्पर्धेत राहुल बागलकोटी व टीमने प्रथम क्रमांक (बक्षीस रुपये १०,०००), नितीन डोंगरे यांनी द्वितीय क्रमांक (बक्षीस रुपये ७५००), तर डॉ. मनोजकुमार माने यांनी तृतीय क्रमांकाचे रोख बक्षीस रुपये ५००० आणि सन्मानचिन्ह प्राप्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. तेजस्विनी कांबळे यांनी केले तर आभार डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी मानले.

## पिलीव येथील जि. प. प्राथमिक केंद्र शाळेच्या चार विद्यार्थ्यांची नवोदयसाठी निवड

सुराज्य/पिलीव

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील जि. प. प्राथमिक केंद्र शाळेच्या चार विद्यार्थ्यांची केंद्रीय नवोदय विद्यालय पोखरापुर येथे निवड झाली आहे.






यामध्ये रुद्र सुहास कोल्हे, हर्षवर्धन अमोल नष्टे, शिवानी गंगाराम ढोले, वैभवी बापु लोखंडे या विद्यार्थनची नवोदयसाठी निवड झाली आहे. या सर्व विद्यार्थ्यांना वैशाली भागवत (फलके) यांचे मार्गदर्शन लाभले.सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकाचे माळशिरस पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी धनंजय देशमुख, विस्तार अधिकारी करडे,केंद्र प्रमुख फासे ,मुख्याध्यापक साळुखे,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष अडव्होकेट वैभव मेथवडे ,पिलीवचे सरपंच नितीन मोहीते, माजी कृषी व पशुसंवर्धन सभापती संग्रामसिंह जहागिरदार, माजी जि प सदस्य गणेश पाटील आदींनी अभिनंदन केले.

## दुचाकीस्वार जखमी प्रकरणी गुन्हा दाखल

सुराज्य/सोलापूर

कर्णिक नगर परिसरात अज्ञात मोटार वाहन चालकाने धडक दिल्याने फिर्यादी व्यंकटेश अंबाजी क्यातम ( वय ५३, रा. न्यु पाच्छा पेठ, कमटम नगर) यांचा भाऊ श्रीनिवास क्यातम यांच्या दुचाकीला धडक दिली. यात श्रीनिवास गंभीर जखमी झाले. याप्रकरणी अज्ञात वाहन चालकावर एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा तपास गायकवाड करत आहेत.




## चंद्रनील सोशल फाउंडेशनतर्फे शालेय साहित्य वाटप

सुराज्य/सोलापूर

शाळा सुरु झाल्याच्या पार्श्वभूमीवर चंद्रनील सोशल फाउंडेशनचे संस्थापक सुशील बंदपट्टे यांनी वडार गल्ली, बुधवार पेठ, न्यू बुधवार पेठ, मराठा वस्ती, स्वीपर कॉलनी, बुधले गल्ली, शाहिर वस्ती, मिलिंद नगर, जय मल्हार चौक, सम्राट चौक, नीला नगर या भागातील महापालिकेच्या शाळेतील तब्बल अकराशे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप केले.

स्व. चंदू भीमशा बंदपट्टे यांच्या स्मरणार्थ तरटी नाका पोलिस चौकीशेजारी रविवारी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप केले. यावेळी आमदार प्रणिती शिंदे, काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे, माजी नगरसेवक बाबा मिस्त्री, प्रवक्ते प्रा. अशोक निंबर्गी, विनोद भोसले, दत्तू बंदपट्टे, आनंद चंदनशिवे, जगदीश पाटील, रामदास इरकल, फौजदार चावडी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक विश्वनाथ सिद, बिज्जू प्रधाने, अंबादास करगुळे, महिला शहराध्यक्ष हेमा चिंचोळकर, भीमाशंकर टेकाळे, देवाभाऊ गायकवाड, अंबादास गुत्तिकोंडा, दिनानाथ शेळके, तिरुपती परकीपंडला, पृथ्वीराज नरोटे, विवेक कन्ना, महेश अलकुंटे, राजाभाऊ कलेकरी, संतोष इरकल, अशोक भांडेकर, दत्तू अलकुंटे, भिमाशंकर बंदपट्टे, विकास विटकर, महेश भांडेकर, गोविंद यमपुरे, सूरज कन्नूरे, श्रीनिवास यमपुरे, संदीप म्हेत्रे आदी उपस्थित होते. आयोजक सुशील बंदपट्टे यांनी प्रास्ताविक केले.आमदार प्रणिती म्हणाल्या, लोकांना मदत करण्याची काँग्रेसची संस्कृती असून आम्ही तुमच्या सेवेसाठीच आहोत. काहीही अडचण असल्यास आम्हाला हक्काने सांगा, आम्ही निश्चितपणे मदत करू.

# आधारवड मराठी चित्रपट आज महाराष्ट्रात प्रदर्शित होणार

सुराज्य/सोलापूर

हिंगलाज माता फिल्म प्रोडक्शन निर्मित आधारवड हा मराठी चित्रपट शुक्रवारी दिनांक २३ जून रोजी सोलापूर सह संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. सदर चित्रपटात मुलांना शिक्षणाबरोबर संस्कारही महत्त्वाचे आहेत. याची जाणीव करून देणारा हा मराठी चित्रपट आहे मुलांना आई-वडिलांना वेळ प्रसंगी पोटाला चिमटे काढून कर्ज काढून शिक्षण दिलेले असते परंतु संस्कार देण्यामध्ये ते कमी पडल्याने आई-वडिलांचे काय हाल होतात ते या चित्रपटातून दाखविण्यात आले आहे.




या चित्रपटात सयाजी शिंदे ऊनशक्ती कपूर, राखी सावंत, अतुल परसुरे, जयराज नायर, स्वप्नील राजशेकर, पुष्पा चौधरी, भक्ती चव्हाण विद्या साळवे या दिग्ग्ज कलांकरांबरोबर सोलापुरातील नवोदित जोडी रोहित हंचाटे व समृध्दी शिमगे यांचे चित्रपटसृष्टीत पदार्पण होत आहे. या चित्रपटात सोलापुरातील राजू पाटील, अशोक किल्लेदार, लताबंदा लुंबिनी, सुमित फुलमाळी, सिध्दारूढ बेडगंनुर, अपर्णा जोशी अशा असंख्य स्थानिक कलाकारांना संधी देण्यात आली आहे.

सदर चित्रपटाचे चित्रीकरण सोलापूर ,नळदुर्ग ,सोरेगाव, बेलाटी ,देगाव टाकळी या शहरी भागात करण्यात आले आहे. या चित्रपटातील गाणी प्रसिध्द गायक सुदेश भोसले ,,अलका याज्ञिक ,अवधूत गुप्ते ,स्वप्निल बांदोडकर, वैशाली माडे ,आदींनी गायले आहेत तर संगीत अमर देसाई प्रथमेश धोंडगे यांनी दिले आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शक सुरेश झाडे यांनी केले असून माजी नगरसेवक राजकुमार हंचाटे यांनी केले आहे .तरी सोलापुरातील कलाप्रेमींनी व सुजान रसिक प्रेक्षकांनी सदरचा चित्रपट पहावा उमा थिएटर येथे सायंकाळी सहा ते नऊ या वेळेत पाहून सहकार्य करावे . कलाकारांना प्रोत्साहित करावे असे आवाहन चित्रपटाचे निर्माते राजकुमार हंचाटे यांनी केले आहे.




## शारिरीक व मानसिक विकासासाठी योगाच प्रभावी ; दिपरत्न गायकवाड

**अकलूज** : योगसाधनेचे मूळ उगमस्थान भारत देश आहे आणि ग्रामीण भागापासून ते शहरापर्यंत योगाचे महत्त्व पटवून देणे काळाची गरज आहे. शारिरीक व मानसिक विकास साधण्यासाठी योग साधना प्रभावी आहे असे मत पोलिस निरिक्षक दीपरत्न गायकवाड यांनी व्यक्त केले.शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज संचलित, महर्षि संकुल यशवंतनगर येथे जागतिक योग दिन उत्साहात पार पडला.यावेळी ते बोलत होते. प्रशालेचे मुख्याध्यापक संजय गळीतकर यांच्या मार्गदर्शनाखाली योग दिनानिमित्त योगा प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले.यावेळी प्रशाला समिति सभापती ड.नितीनराव खराडे उपस्थीत होते.संकुलातील सहशिक्षक प्रा. धनंजय देशमुख यांनी आपल्या टीमच्या माध्यमातून ताडासन ,पद्मासन, वज्रासन, हलासन अशा विविध योगासनांचे प्रात्यक्षिक सादरीकरण केले .त्याचप्रमाणे ओंकार, प्रार्थना ,पूरक हालचाली सूर्यनमस्कार प्राणायाम, ध्यान,योगनिद्रा आणि विविध योगासने करण्यात आली.संकुलातील सर्व विद्यार्थी , प्रशाला समिती सदस्य अनिल जाधव, विनोद जाधव, संकुलातील मुख्याध्यापक शिवाजी पारसे, सविता गायकवाड ,उपमुख्याध्यापक भारत चंदनकर,पर्यवेक्षक अंकुश एकतपुरे यांनी योगाचे प्रात्यक्षिक करत उपक्रमात आपला सहभाग नोंदवला. सारे जहाँ से अच्छा या समूहगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरण सूर्यवंशी यांनी केले तर आभार र.वी. गायकवाड यांनी मानले.

## लोकमंगल पतसंस्थेच्या मोडनिंब शाखेत योगदिन

**मोडनिंब** : जागतिक योगदिनाच्या निमित्ताने लोकमंगल पतसंस्था मोडनिंब शाखेच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गंगखोरी मोडनिंब येथे योगदिन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. विद्यार्थ्यांना योगासनांची गोडी लागावी शरीर निरोगी राहण्यासाठी विद्यार्थी जीवनात करावयाच्या विविध व्यायाम प्रकार घेण्यात आले. यावेळी लोकमंगल पतसंस्थेचे मॅनेजर समाधान वसेकर, शाळेचे मुख्याध्यापक महेंद्र कोळी, इतर शिक्षक व तसेच शाखेचा सर्व स्टाफ स्टाफ उपस्थित होता. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांना लोकमंगल पतसंस्थेच्या मोडनिंब शाखेच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊ वाटप करण्यात आले.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी नितीन पडदुणे,विकास जाधव, विकास माळी, प्रगती पाटील, ऋषिकेश गायकवाड यांनी परिश्रम घेतले.

## शिवरत्न नॉलेज सिटीत जागतिक योगदिन उत्साहात साजरा

**अकलूज** : येथील शिवरत्न नॉलेज सिटी परिसरात विजयसिंह मोहिते पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग न्ड मेडिकल रिसर्च व शिवरत्न इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, ग्रीनफिंगर्स कॉलेज ऑफ कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी व शिवरत्न शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून जागतिक योगदिन उत्साहात साजरा करण्यात आला. नॉलेज सिटी परिसरातील ऑडिटोरियममध्ये आयोजित केलेल्या या कार्यक्रमात क्रीडा संचालक डॉ. महेश ढेंबरे यांनी उपस्थित विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना योगाचे प्रशिक्षण दिले. भारताकडून समस्त जगाला महत्व पटवून देणारा योग किती महत्वाचे आहे हे आपल्या प्रास्ताविकातून बीबीए महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरविंद कुंभार यांनी मांडले.या वेळी विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मोडनिंबमध्ये पतंजली युवा भारतच्या युवकांनी दिले योगाचे धडे

**मोडनिंब** : मोडनिंब व अरण परिसरातील शाळेतील विद्यार्थ्यांना पतंजली युवा भारतच्या युवकांनी संपूर्ण योगाचे धडे दिले. परिसरातील ९ शाळांना सदर युवकांकडुन योगाभ्यासाचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करणेत आले. यामधे श्री. उमा महाविद्यालय,मोडनिंब येथे महेश पवार व डॉ. सुहास खडके, जयंत पाटील यांनी तर संजीवन विद्यालय व ज्युनियर कॉलेज, मोडनिंब येथे मोहन कुंभार, निलेश गिड्डे,प्राचार्य सुभाष रणदिवे,प्रविण राजगे यांनी योगाभ्यास घेतला. अरण येथे श्री.तानाजी इंगळे व शिक्षक स्टाफ तर वरवडे व नेवरे नांदुरे येथिल शाळेत मोहन कुंभार, महेश पवार व निलेश गिड्डे यांचेकडुन योगाभ्यास घण्यात आला.आश्चर्य म्हणजे सदर पतंजली युवा भारतच्या वतीने सबंध मोडनिंब करासाठी शिवपार्वती मंगल कार्यालयात पहाटे साडेपाच ते सात यावेळेत योगाभ्यासाचे नियोजन करणेत आले होते.याप्रसंगी माढा न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश, जि.प.माजी सभापती शिवाजी कांबळे,मोडनिंब चे आजी माजी सरपंच,मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वच्छतेसाठी १५४८ कर्मचाऱ्यांची नियुक्ती

**सुराज्य/पंढरपूर**

**आषाढी शुद्ध एकादशी २९ जून २०२३ रोजी होणार असून, आषाढी यात्रा कालावधीत पंढरपुरात श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी परराज्यासह राज्यातील इतर जिल्ह्यातून सुमारे १० ते १२ लाख भाविक येतात. येणाऱ्या भाविकांच्या व स्थानिक नागरिकांच्या आरोग्य सुरक्षितेच्या व स्वच्छतेच्या दृष्टीने आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नगरपालिका प्रशासन सज्ज असल्याची माहिती मुख्याधिकारी अरविंद माळी यांनी दिली.**

## चंद्रभागा नदीपात्रातून काढला ६४ टन कचरा



आषाढी यात्रा कालावधीत शहरासह नदी पात्र, वाळवंट ,६५ एकर परिसर ,पत्रा शेड, प्रदक्षिणा मार्ग, मंदीर परिसर, वाखरी पालखी तळ आदी ठिकाणच्या स्वच्छतेसाठी १५४८ स्वच्छता कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली असून यामध्ये ३४८ कायम तर १००० हंगामी कर्मचारी तसेच जिल्ह्यातील इतर नगरपालिकेकडून २०० कर्मचारी स्वच्छतेसाठी नेमण्यात आले आहेत. प्रशासनामार्फत ६५ एकर तसेच वाखरी येथे स्वच्छता, पाणी पुरवठा, शौचालयांच्या दुरुस्त्या करण्यात आल्या आहेत. नदीपात्रातून जवळपास ६४ टन कचरा काढण्यात आला आहे.

शहरातील ६५ एकर तसेच वाखरी येथील शौचालयांच्या दुरुस्त्या,इतर स्वच्छता करण्याचे काम सुकरण्यात आले आहे., पाणीपुरवठ्याच्या सर्व यंत्रणा सुस्थितीत करण्यात आले आहेत. आषाढी यात्रा कालावधीत महिलांच्या स्वच्छतेच्या व सुरक्षिततेच्या दृष्टीने शहरामध्ये वेगळ्या शौचालयांची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच महिलांच्या वैयक्तिक स्वच्छतेच्या अनुषंगाने नदी पात्र, वाळवंट परिसर, वाखरी पालखी तळ, ६५ एकर व शहरातील सर्व सुलभ इंटरनॅशनल शौचालयमध्ये सॅनेटरी नॅपकिन वेडींग मशिन बसविणेत येणार आहेत. भाविकांना स्वच्छ पिण्याचा पाण्याचा पुरवठा व्हावा यासाठी शहरातील सार्वजनिक बोरवेल, हातपंप आदी ठिकाणच्या पाण्याची तपासणी करण्यात आली आहे.तसेच दररोज पिण्याच्या पाण्याची क्लोरीन टेस्ट केली जाणार आहे.

शहरासह ६५ एकर, वाळवंट, पत्राशेड आदी ठिकाणी जंतनाशक फवारणीसह ,मॅलेथॉन पावडर, ब्लिचिंग पावडर वेळोवेळी टाकण्यात येत आहे. घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत डम्पिंग ट्रॉल्या ,कॉम्पॅक्टर, कंटेनर, घंटागाडी, जेसीबी आदी वाहनांच्या माध्यमातून कचरा गोळा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यात्रा कालावधीत या घंटागाड्या सकाळी व रात्री अशा दोन वेळेस घरोघरीचा कचरा गोळा करतील. दररोज ५५ ते १२० टन इतका कचरा उचलण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यात्रा काळात शहरातील व उपनगरातील सर्व मैदाने, नदी परिसर, ६५ एकर, पत्राशेड दर्शनबारी रोजचे रोज स्वच्छ व निर्जंतुक करण्यात येणार असल्याची माहिती मुख्याधिकारी माळी यांनी दिली. यात्रेकरुंच्या सोयीसाठी जिल्हा प्रशासनाकडुन ६५ एकर, नदी पात्र, पत्राशेड, मंदिर परिसर, वाखरी पालखी तळ या ५ ठिकाणी आपत्तीव्यवस्थापन कक्षाची स्थापना करण्यात आली असून स्वच्छतेच्या व रात्रपाळीच्या कामासाठी जिल्ह्यातील इतर नगरपालिकांकडून २०० कर्मचाऱ्याची नियुक्ती करण्यात येणार आहे. त्याचबरोबर पत्राशेड, वाळवंट ६५ एकर परिसर, रेल्वे मैदान आदी ठिकाणी १८०० तात्पुरते शौचालय उभारण्यात येणार असून, आवश्यकतेनुसार त्यात वाढ करण्यात येणार असून. तात्पुरत्या शौचालयाच्या ठिकाणी पाण्याच्या टिपा ठेऊन त्यामध्ये टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येणार आहे. वारकरी भाविकांनी उघड्यावर शौच विधी करू नये म्हणून प्रतिबंधक पथकांची नेमणूक देखील करण्यात आली असल्याची माहिती मुख्याधिकारी माळी यांनी दिली. यात्रा कालावधीमध्ये येणाऱ्या भाविकांनी शौचालयाचा वापर करावा, सिंगल युज प्लास्टिकचा वापर टाळावा तसेच आरोग्य सुव्यवस्थीत राहण्यासाठी नगरपालिका प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे असे आवाहनही मुख्याधिकारी श्री. माळी यांनी यावेळी केले आहे.

# सांगोला येथे चप्पल दुकान फोडले

## रोख रकमेसह ३ लाख ७५ हजारांचा माल गायब

**सुराज्य/सोलापूर**

चप्पल दुकानाच्या पाठीमागील पत्रा उचकटून चोरट्याने दुकानातील १ लाख १८ हजार रुपये रोख आणि विविध कंपनीचे बुट आणि इतर साहित्य असा एकूण ३ लाख ७ १ हजार रुपयाचा माल पळविला. ही चोरी सांगोला येथील मिरज रोडवर असलेल्या महालक्ष्मी शू पॅलेस येथे बुधवारी पहाटेच्या सुमारास घडली.

यासंदर्भात दुकानाचे मालक मयूर मधुकर माळी (रा.सांगोला ) यांनी सांगोला पोलिसात फिर्याद दाखल केली .त्याप्रमाणे पोलिसांनी अनोळखी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला . बुधवारी पहाटेच्या सुमारास चोरट्याने महालक्ष्मी दुकानाच्या पाठीमागील पत्रा उचकटून आत प्रवेश केला. आणि काउंटर मधील रोकड घेतली . तसेच विविध कंपन्याचे ४२५ जोड नवीन बूट चोरून नेले . अशी नोंद पोलिसात झाली आ .हे हवालदार व्हरे पुढील तपास करीत आहेत .

## तरूणाला मारहाण; एकावर गुन्हा दाखल

**सुराज्य/सोलापूर**

तू मला ओळखत नाही का, मला चायनिसचे चारच पीस देतो का म्हणत तरूणाला लोखंडी हुकाने मारून जखमी केल्याप्रकरणी प्रशांत नंदकुमार गोतसुर्वे (वय ३९, रा. गांधी नगर भाग २, अक्कलकोट रोड) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून सॅन्डी नामक तरुणावर गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना बुधवारी घडली. घटनेचा तपास राठोड करत आहेत.

# धार्मिक सलोखा बिघडू देऊ नका, अक्कलकोट शिष्टमंडळाचे निवेदन

**सुराज्य/अक्कलकोट**

अक्कलकोट शहर व तालुक्यातील धार्मिक सलोखा बिघडू देऊ नका. शांतता बिघडवु देऊ नका. दोषींवर योग्य ती कायदेशीर कारवाई करा, अशा आशयाचे निवेदन अक्कलकोट शिष्टमंडळाच्या वतीने सोलापूर ग्रामीण पोलीस अधिक्षक यांना देण्यात आले.

कडबगांव येथे तीन तरूणांनी १० जून रोजी समाजमाध्यमावर आक्षेपार्ह पोस्ट ठेवल्याप्रकरणी दक्षिण पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल झाला होता. त्याची प्रतिक्रिया म्हणुन त्या मुलांना मारहाण झाल्याबद्दल दहा ते बारा जणांविरुद्ध मारहाणीचा गुन्हा दाखल झाला होता. यामुळे तालुक्यातील शांतता बिघडू नये म्हणुन जनजागृती साठी पोलीसांनी पथसंचलन केले होते.

धार्मिक सलोखा बिघडू नये व दोषींवर कडक कारवाई व्हावी म्हणून विविध पक्षाच्या शिष्टमंडळाच्या वतीने निवेदन देऊन विविध मागणी करण्यात आली.

कडबगांव ता.अक्कलकोट येथील तीन तरूणांनी महापुरूषाबद्दल आक्षेपार्ह स्टेट्स ठेवल्यामुळे गुन्हा दाखल झाला आहे. दोन समाजात तेढ निर्माण होवून सार्वजनिक शांतता बिघडवुन समाजा समाजामध्ये धार्मिक तेढ निर्माण होण्याच्या उद्देशाने समाजमाध्यमावर आक्षेपार्ह स्टेटस ठेऊन धार्मिक भावना दुखावल्या बद्दल गुन्हा दाखल झाला होता.

यावेळी माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्यासह अश्पाक बळोरगी, राम जाधव, बाबासाहेब पाटील, सुनिल खवळे, वंचितचे तालुकाध्यक्ष चंद्रशेखर मडिखांबे, रवी वरनाळे यांच्या सह कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

## पालेभाज्या व इतर भाज्यांचे दरात प्रचंड वाढ झाल्यामुळे गृहिणींचे आर्थिक बजेट बिघडले

**सुराज्य/पिलीव**



महाराष्ट्रात सध्या पावसाळा सुरु होऊन महीना होऊन गेला रोहीणी व मृग नक्षत्र कोरडेच गेले त्यामुळे प्रचंड पाणी टंचाई जाणवु लागली आहे .सध्या अनेक गावात पिण्याच्या पाण्याचीच टंचाई आहे त्यामुळे शेतीच्या पाणयाचा तर विषयच नाही. शेतकऱ्यांनी जमिनीची मशागत करुन ठेवली आहे पण पाऊस आल्या शिवाय काहीच करता येत नाही अशी परिस्थिती आहे.

यामुळे पालेभाज्या किंवा इतर भाज्या नाहीत. याचा परिणाम असा झाला की उत्पादनच नाही. याचा परिणाम यामुळे दरात प्रचंड वाढ झाल्याचे दिसत आहे. सध्या बाजारात वांगी ८० रुपये किलो, टोमॅटो ६० ते ८० रुपये किलो, हिरवी मिरची १२० रुपये किलो घेवडा शेंग ८० रुपये किलो, भेंडी ६० रुपये किलो, कारले ८० रुपये किलो, काकडी ६० रुपये, शिमला मिरची ८० रुपये, पालेभाज्या मध्ये कोथींबिर १५ ते २० रुपये पेंडी,भेळा ४० रुपये, मेथी,शेपु ,पालक २० ते ३० रुपये पेंडी सध्या बाजारात कांदा व बटाटा सोडला तर इतर भाज्यांचे दर गगनाला भिडले आहेत.

सध्या नुकत्याच शाळा सुरु झाल्या आहेत यामुळे डब्बयात काय द्यायचे कोणती भाजी द्यायची हा प्रश्न आईना पडला आहे. तर दर गगनाला भिडल्यामुळे सर्व सामान्यानी कोणती भाजी खायची हा प्रश्न निर्माण झाला आहे. आता चांगला पाऊस पडल्यावरच व शेतकऱ्यांनकडे भाज्या आल्या शिवाय दर कमी होणे दुरापस्त आहे.ग्रामीण भागात दराची ही विदारक परिस्थिती आहे मग शहरात तर यापेक्षा प्रचंड दर वाढलेले आहेत.

## 'सुभेदार' चित्रपट २५ ऑगस्टला चित्रपटगृहात

**सोलापूर** : सुभेदार हे मुलकी आणि लष्करी दोन्ही प्रकारचे महत्त्वाचे पद...त्यांच्या अतुलनीय शौर्या बरोबरच त्यांच्या प्रशासकीय पैलूंवर प्रकाश टाकणारा भव्य ऐतिहासिक चित्रपट म्हणजे सुभेदार'!सुभेदार तान्हाजी मालुसरे यांच्या पराक्रमाचा सुवर्ण इतिहास रुपेरी पडद्यावर मांडणाऱ्या सुभेदार' चित्रपटाचा टीझर नुकताच प्रदर्शित झाला आहे.पहिला मानाचा मुजरा' असं म्हणत प्रेक्षकांच्या भेटीला आलेल्या या टीझरमधून अतुल्य शौर्याची झलक पहायला मिळतेय. लेखक-दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर यांच्या शिवराज अष्टकातील पाचवे चित्रपुष्प असलेला सुभेदार' चित्रपट २५ ऑगस्ट २०२३ ला चित्रपटगृहांत झळकणार आहे.

## थरारक मालिका प्रेक्षकांच्या भेटीला

**सोलापूर** : देशातील नामवंत आणि आघाडीचा मनोरंजन मंच असलेल्या हंगामाने एक अत्यंत थरारक आणि खिळवून ठेवणारी मालिका प्रेक्षकांच्या भेटीसाठी आणली आहे. मौका या धोका असं या मालिकेचे शीर्षक असून ही मर्डर मिस्ट्री धाटणीची मालिका असणार आहे.सिद्धार्थ रॉय म्हणाले की,मौका या धोका ही असंख्य उत्कंठावर्धक आणि रहस्याचा शेवटपर्यंत खुलासा न होणारी सिरीज आहे. उत्तम कथानक,तगडे कलाकार यामुळे ही सिरीज प्रेक्षकांना खिळवून ठेवणारी बनली आहे.प्रेक्षकांना उत्तम मनोरंजनाद्वारे खिळवून ठेवणे हे हंगामाचे उद्दीष्ट्य असून ही मालिका देखील त्याला अपवाद नाही.

## अन्नछत्र मंडळाचे कार्य अक्कलकोटच्या विकासाला चालना देणारे : धाईंजे

**सुराज्य/अक्कलकोट**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली सुरु असलेली विकास कामे तीर्थ क्षेत्र अक्कलकोटच्या विकासाला चालना देणारे असून राज्याच्या नगर विकास विभागाकडून विकास कामांकरिता न्यासाला सहकार्य करू, असे मनोगत राज्याच्या नगर विकास विभागाचे न. वि. १८ चे कक्ष अधिकारी विलासराव धाईंजे यांनी व्यक्त केले.

ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आले असता न्यासाचे सचिव शामराव काका मोरे यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी ते बोलत होते.

त्यांच्या समवेत अक्कलकोट नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सचिन पाटील, न.प. आरेखक, मलिक बागवान, विठ्ठलराव तेली उपस्थित होते. यावेळी, न्यासाचे पुरोहित संजय कुलकर्णी, सौरभ मोरे, आप्पा हंचाटे, बाबुशा महिंद्रकर, अमित थोरात, एस.के. स्वामी, शावरेप्पा माणकोजी, सिद्धाराम कल्याणी, विनायक तोडकर, महादेव अनगले, धनप्पा उमदी, मल्लिकार्जुन बिराजदार, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, नामा भोसले, बाळासाहेब घाडगे, श्रीनिवास गवंडी, प्रसन्ना बिराजदार, दत्ता माने, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, रमेश हेगडे, महांतेश स्वामी, धनंजय निंबाळकर, अनिल बिराजदार, मल्लिनाथ कोगनुरे, लाला निंबाळकर, कल्याण देशमुख यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# क्रांतिकारकांच्या भक्कम इतिहासावरच देशाचे उज्वल भविष्य: आ. पाटील

**सुराज्य/सांगोला**




देशाला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी अनेक देशभक्तांनी, क्रांतिकारकांनी खूप मौलिक कार्य केले आहे.त्यांच्या विचारांचे बाळकडू या अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत दिले जात आहे. या अभियानात कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्टचे संग्रहात असलेल्या २००० क्रांतिकारकांच्या छायाचित्रांचे प्रदर्शन १०००० देशभक्तांची माहिती व १५००० हुतात्म्यांची माहिती देणारा असा देशभक्तकोश या साहित्याचा दुर्मिळ असा डिजीटल डेटा व प्रदर्शन सांगोला तालुक्यातील विद्यार्थ्यांना पाहता येणार आहे.यामुळे प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यंत ओळख देशभक्तांची, शाळा तेथे क्रांतीमंदीर हे अभियान पोहोचेल व भारतीय क्रांतिवीरांच्या बलिदानाचा, राष्ट्र कार्याचा इतिहास विद्यार्थ्यांना अधिक ज्ञात होईल.
– **चंद्रकांत शहासने** देशभक्तकोशकार

अनादिकाळापासून भारताचा इतिहास सर्व बाजूंनी जाज्वल्य असा आहे. त्यामध्ये स्वातंत्र्य चळवळीतील क्रांतिकारकांचा, देशभक्तांचा भक्कम इतिहास खूप प्रेरणा देणारा आहे.त्याची देशभक्ति,त्याग,धाडस लक्षात घेण्याची गरज आहे. आज देशभक्तांची ओळख, शाळा तेथे क्रांती मंदिर या अभियानाच्या माध्यमातून हा इतिहास विचार आणि कृती करणाऱ्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहचतो आहे. त्यामुळे उद्याचा भारत उज्ज्वल होईल असे प्रतिपादन आमदार ड शहाजीबापू पाटील केले.सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्युनिअर कॉलेज येथे कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट पुणे 'देशभक्तांची ओळख,शाळा तेथे क्रांती मंदिर ' अभियान उद्घाटन समारंभामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.यावेळी व्यासपीठावर देशभक्तकोशकार चंद्रकांत शहासने, माजी नगराध्यक्ष रफिक नदाफ, कार्यक्रमाचे अध्यक्ष व सां.ता.शि.प.प्र.मंडळ,सांगोला अध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, सचिव म.शं. घोंगडे, खजिनदार शंकरराव सावंत, संस्था कार्यकारिणी सदस्य विश्वेश झपके, प्राचार्य गंगाधर घोंगडे उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्युनिअर कॉलेजचे उपमुख्याध्यापक लक्ष्मण विधाते, उपप्राचार्य शाहिदा सय्यद, पर्यवेक्षक अजय बारबोले, बिभिषण माने, पोपट केदार यांच्यासह शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य गंगाधर घोंगडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.धनाजी चव्हाण यांनी केले

# नागरिकांना बिबट्याची भीती

## माळशिरस तालुक्यातील निमगाव, कुसमोड, चांदापुरी भागात घबराट

**सुराज्य/पिलीव**



माळशिरस तालुक्यातील कुसमोड, निमगाव या गावात बिबट्याचा वावर आढळून आला आहे. यामुळे या भागातील नागरिकांमध्ये प्रचंड भितीचे वातावरण पसरले असतानाच रविवारी चांदापुरी - पठाणवस्ती हददीत रात्री आठ वाजता बाषुभाई पठाण यांना बिबट्या सदृश्य प्राणी दिसला.यानंतर त्यांनी रहीवाशयांना सांगितले. यानंतर बिबट्या शिंगाडे वस्ती पाठीमागील उसाजवळ बसला आहे. वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी सोमवारी सकाळी याठिकाणी येऊन पाहणी केली असता ठशयावरुन तो बिबटयाच असल्याचे सांगितले.

तसेच या अगोदर कोळपेवस्ती येथील अशोक कोळपे यांच्या म्हशीचा रेडा बिबटयाने फाडून खाल्ला .तर निमगाव येथील किशोर बोडरे यांच्या बकऱ्यावर हल्ला केला होता .यामुळे सध्या कुसमोड, निमगाव, पठाणवस्ती, चांदापुरी भागात बिबट्या सदृश्य प्राण्याचा वावर आढळुन आला असुन नक्की या वेगवेगळ्या गावात बिबट्या दिसत आहेत यामुळे बिबट्या एकच आहे का तिन आहेत हे मात्र अदयापही निश्चितपणे माहीत नाही. मात्र नागरिकामध्ये व विदयार्थी मध्ये सध्या प्रचंड भितीचे वातावरण पसरले आहे. वनविभागाच्या अधिकाऱ्यांन मार्फत सध्या पिंजरे लावले जात आहेत मात्र बिबट्या पकडणयात अदयापही त्यांना यश आले नाही. वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी बिबट्यांना ताबडतोब पकडणयासाठी उपाययोजना कराव्यात अशी मागणी नागरिकांमधुन होत आहे.

## ▶▶ महत्त्वाचे वृत्त

### ठाणे भाजपात संदोपसंदी वाढली!

✔ सुराज्य/ठाणे : शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणून वर्षानुवर्षे ओळखल्या जाणाऱ्या ठाणे जिल्ह्यात झपाट्याने विस्तारू लागलेल्या भाजपला सध्या ग्रामीण पट्ट्यात केंद्रीय राज्यमंत्री कपील पाटील आणि राज्यमंत्री मंडळातील समावेशासाठी आस लावून बसलेले किसन कथोरे या दोन दिग्गज नेत्यांमधील टोकाचा विसंवाद सतावू लागला आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातून आयात केलेल्या या दोन नेत्यांच्या जोरावर भाजपने भिवंडी, शहापूर, मुरबाड या पट्ट्यात उत्तम मांड बसवली आहे. जिल्हा परिषदेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या समर्थकांचे बहुमत असले तरी पाटील, कथोरे यांचा प्रभाव मात्र ग्रामीण पट्ट्यात कायम आहे. असे असताना या दोन नेत्यांमधील मतभेद मात्र दिवसागणिक वाढू लागल्याने ठाणे जिल्हा पदाक्रांत करण्याचे स्वप्न पहाणाऱ्या भाजप श्रेष्ठींची डोकेदुखी वाढली आहे.

### नागपूरमध्ये भाजपा कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता

✔ सुराज्य/नागपूर : राज्यात सत्तेत येऊन वर्षभराचा काळ लोटला तरी विविध महामंडळांवर कार्यकर्त्यांच्या नियुक्त्या नाहीत, मंत्रालयाशी संबंधित कामे होत नाहीत आणि दुसरीकडे संघटनेत नव्याने आलेल्यांना महत्त्वाची पदे दिली जातात. यामुळे भारतीय जनता पक्षातील जुन्या कार्यकर्त्यांमध्ये नाराजी असून काहींनी ती वरिष्ठांकडे बोलूनही दाखवली आहे. भाजपने महाजनसंपर्क अभियानाच्या माध्यमातून जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्याचे उद्दिष्ट कार्यकर्त्यांना देण्यात आले. मात्र हे सर्व करणाऱ्या जुन्या कार्यकर्त्यांच्या भावना पक्षात कोणी ऐकून घेत नाही, अशी भावना पक्षात वाढीस लागली आहे.

### उद्धव ठाकरेंनी २५ वर्षे मुंबई लुटले : दरेकर

✔ सुराज्य/अमरावती : माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सत्ताकाळात कधीही घराबाहेर पाऊल ठेवले नाही. खिशाला पेन लावला नाही. आता गेल्या दहा महिन्यांत सत्ता नसताना शेतकरी, सामान्यांच्या प्रश्नावर कधीही मोर्चा काढल्याचे आठवत नाही. त्यांनी २५ वर्षे मुंबईला लुटले, आता मुंबई महापालिकेतील भ्रष्टाचाराची चौकशी 'एसआयटी'मार्फत होणार असल्याने उद्धव ठाकरे अस्वस्थ झाले आहेत, म्हणून ते येत्या १ जुलैला ते मोर्चा काढत आहे, अशी टीका विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांनी येथे केली. बुधवारी रात्री येथील नेहरू मैदानावर आयोजित भाजपाच्या महाजनसंपर्क सभेत ते बोलत होते.

### ग्राहक आयोगाच्या नियुक्त्या रखडल्या

✔ सुराज्य/नागपूर : मंत्रालयातील ग्राहक संरक्षण विभागातील अधिकाऱ्यांच्या अकार्यक्षमतेने गेल्या दोन वर्षांपासून महाराष्ट्र ग्राहक आयोगाचे अध्यक्ष व सदस्यांच्या नियुक्त्या रखडल्या आहेत. या अकार्यक्षम अधिकाऱ्यांना कार्यमुक्त करा, अशी मागणी ग्राहक पंचायत महाराष्ट्रकडून शासनाला करण्यात आली आहे. संघटनेचे विदर्भ प्रांत अध्यक्ष श्यामकांत पात्रिकर म्हणाले, 'सर्वोच्च न्यायालयाने ३ मार्च २०२३ रोजी ९० दिवसांमध्ये ग्राहक आयोगातील अध्यक्ष आणि सदस्यांच्या नियुक्तींचे आदेश दिले. त्यानुसार शासन स्तरावरून ८१ दिवसांनी २३ मे २०२३ रोजी अर्ज मागवणारी जाहिरात दिली. परंतु, त्यात खूप चुका होत्या. त्यामुळे या जाहिरातीला उच्च न्यायालयामध्ये आव्हान देण्यात आले.'

### मातोश्रीजवळ ठाकरे गटाच्या शाखेवर हातोडा

✔ सुराज्य/मुंबई : 'बेकायदेशीर' ठरवत बृहन्मुंबई महापालिकेने गुरुवारी दुपारी शिवसेनेच्या (यूबीटी) शाखेवर हातोडा चालवला आहे. ही शाखा वांद्रे पूर्वेकडील निर्मल नगर परिसरात होती. मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने वांद्रे पूर्व परिसरात ठाकरे गटाच्या वतीने बांधलेल्या कार्यालयावर बुलडोझर फिरवला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटप्रमुख उद्धव ठाकरे यांचे निवासस्थान असलेल्या मातोश्रीपासून अवघ्या १५ मिनिटांच्या अंतरावर ही शाखा आहे. ठाकरे गटाच्या वतीने उभारण्यात आलेले ऑटो ड्रायव्हर्स वेल्फेअर असोसिएशनचे कार्यालय अनधिकृत असल्याचा दावा पालिका अधिकाऱ्यांकडून करण्यात आला. त्यामुळे या कार्यालयावर कारवाई करण्यात आली आहे, अशी माहिती पालिका अधिकाऱ्यांनी दिली.

### ठाण्यात १३७ कोटींचा धान्य घोटाळा उघड

✔ सुराज्य/मुंबई : ठाणे जिल्ह्यातील शहापूर विभागात आदिवासी विकास महामंडळाच्या धान्य खरेदीमध्ये झालेल्या १३७ कोटी रुपयांच्या घोटाळाप्रकरणी शासनाच्या निधीचा गैरवापर करून आर्थिक फसवणूक केल्याचा ठपका ठेवत प्रादेशिक व्यवस्थापक विजय गांगुर्डे आणि अन्य तीन अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. आमदार संजय केळकर यांनी वर्षभर पाठपुरावा केल्यानंतर ही कारवाई झाली आहे. या अधिकाऱ्यांची लाचलुचपत विरोधी विभागामार्फत चौकशी करण्याची मागणीही केळकर यांनी केली आहे.

### पिठाच्या डब्यात सोने ठेवणं पडलं महागात

✔ सुराज्य/बीड : महिला म्हटलं की पैसे आणि दागिने हे ठेवण्यासाठी कोणती शक्कल लढवतील सांगता येत नाही. असाच प्रत्यय आला आहे बीड जिल्ह्यातील दहिफळ वडमाऊली येथील एका घटनेनं. येथे पिठाच्या डब्यात तब्बल ५४ हजार रुपयांचे दागिने महिलेने ठेवले होते. मात्र, भंगारवाल्याला पीठ देताना हे दागिने वर काढले असता चक्क भंगारवाल्याने हे दागिने लंपास केल्याची घटना बीड जिल्ह्यातील केज तालुक्यात असलेलं दहिफळ वडमाऊली या ठिकाणी घडली आहे. या प्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रार देखील दाखल करण्यात आली आहे.

### इंदुरीकर महाराजांनी घेतली धास्ती

✔ सुराज्य/नांदेड : गौतमी पाटील हिच्यावर टीका केल्यानंतर इंदुरीकर महाराजांनी आता प्रसार माध्यमांची तसेच सोशल मीडियाची चांगलीच धास्ती घेतल्याचे दिसत आहे. नांदेडमध्ये झालेल्या एका कार्यक्रमात इंदुरीकर महाराजांनी कार्यक्रमात चक्क चित्रीकरण करणारे माध्यमांचे कॅमेरे बंद करायला लावले. इंदुरीकर महाराजांनी माध्यमांच्या कॅमेऱ्यांबरोबरच मोबाइलवर शूटिंग करण्यासही मज्जाव केला. इंदुरीकर महाराज कीर्तन करताना आपल्या शैलीतून अनेकांचा समाचार घेतात. काही दिवसापूर्वी इंदुरीकर महाराजांनी एका कार्यक्रमात गौतमी पाटील हीचा समाचार घेत टीका केली होती. गौतमी पाटील ही एका गाण्यासाठी तीन लाख रुपये घेते, असे वक्तव्य इंदुरीकर महाराज यांनी केले होते. त्यांच्या या वक्तव्याने नवीन वाद निर्माण झाला होता.

### वकिलाच्या मारहाणीत शेतकरी जखमी

✔ सुराज्य/नांदेड : राज्यात अनेक ठिकाणी गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ झालेली आहे. हल्ली क्षुल्लक कारणावरून वाद होतात, त्यानंतर त्या वादाचे पर्यवसन हाणामारीत होते, कधी कधी तर वाद इतके टोकाला जातात की त्यामध्ये एकमेकांचा जीव घ्यायला देखील लोक घाबरत नाही. अशीच एक घटना पुण्यात घडली आहे. पुण्यातील दर्शना पवार या तरुणीचे प्रकरण ताजे असतानाच आता क्षुल्लक कारणावरून दोन गटात झालेल्या वादात वकिलाने शेतकऱ्याला मारहाण केल्याची माहिती समोर आलेली आहे. या घटनेत शेतकरी राजेंद्र दिनकर चव्हाण (रा. वाडेबोल्हाई) यांना बेदम मारहाण करण्यात आली आहे. यामुळे ते गंभीर जखमी झाले असून त्यांना उपचाराकरिता रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे.

# माझ्या मुलीचे जसे तुकडे केले तसेच तुकडे मी राहुलचे करणार

## दर्शनाच्या आईची आणि भावाची संतप्त प्रतिक्रिया

### ▶ दर्शनाचा मृतदेह राजगडाच्या पायथ्याशी आढळला होता

✔ सुराज्य/पुणे

**दर्शना पवार हत्या प्रकरणात पोलिसांनी राहुल हंडोरेला अटक केली आहे. दर्शनाची हत्या राहुल हांडोरेनेच केल्याची कबुली दिली असल्याचं पोलिसांनी सांगितलं. राजगडाच्या पायथ्याशी दर्शना पवारचा मृतदेह आढळला होता. त्यानंतर तिचा मित्र राहुल हंडोरे गायब झाला होता. त्याला मुंबईतून अटक करण्यात आली आहे.**

राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत राज्यात तिसरी आलेल्या दर्शना पवारच्या हत्येप्रकरणी पुणे पोलिसांनी मोठा खुलासा केला आहे. हत्येनंतर फरार झालेला मुख्य आरोपी राहुल हांडोरेला अटक केल्यानंतर पोलिसांनी पत्रकार परिषद घेत या प्रकरणाबाबत माहिती दिली. यात त्यांनी राहुल हांडोरेने दर्शना पवारची हत्या का केली याचं कारणही सांगितलं.

पोलीस म्हणाले, 'आम्हाला सखोल तपास करण्यासाठी वेळ मिळालेला नाही. मात्र, प्राथमिक तपासात असं दिसतंय की, दर्शना पवारने राहुल हांडोरेला लग्नासाठी नकार दिला. त्यामुळे त्याने दर्शनाचा खून केला. दोघांचीही खूप जुनी ओळख आहे. आरोपीला राहुलला दर्शनाबरोबर लग्न करायचं होतं. दर्शनाने या लग्नाला नकार दिला म्हणून राहुलने खून केल्याची प्राथमिक माहिती आहे. यानंतर दर्शना पवारच्या आईची आणि भावाची संतप्त प्रतिक्रिया समोर आली आहे.

**काय म्हटलं आहे दर्शना पवारच्या आईने?**

मला मुंबईला घेऊन जा. माझ्या दर्शनाचे जसे तुकडे केले तसेच त्या राहुलचे तुकडे मी करते. मी एकटीच तुकडे करेन मला कुणाचीच मदत नको. माझ्या मुलीची हत्या केली तशीच मला त्याची हत्या करायची आहे. मला माझ्या मुलीला न्याय द्यायचा आहे आणि मीच देईन तो न्याय. राहुल हांडोरेला फाशीची शिक्षा झाली पाहिजे. तो जिवंत रहायलाच नको. आणखी १० मुलींचं पुढे नुकसान व्हायला नको. माझी मुलगी गेली, तशी इतर कुणाची मुलगी जाऊ नये. त्यामुळे राहुल हांडोरेला फाशीच







दर्शना हत्याकांड प्रकरण

### दर्शनाच्या भावाने काय म्हटले आहे?

राहुल हांडोरेला आमच्या ताब्यात द्या किंवा मारुन टाका त्याला. त्याला जिवंत सोडता कामा नये. त्याच्यामुळे माझ्या बहिणीला त्रास झाला आहे, त्याला मारा किंवा आमच्याकडे द्या एवढीच विनंती आहे सरकारला.

### का केली हत्या?

दर्शना आणि राहुल एकमेकांचे नातेवाईक आहे. दोघे एकमेकांना अनेक वर्षांपासून ओळखत होते. दर्शनासोबत लग्न करण्याची राहुलची इच्छा होती. दोघेही एमपीएससीची परीक्षा देत होते. मात्र, या प्रयत्नांमध्ये दर्शनाला आधी यश आले आणि तिने वन विभागाची परीक्षा उत्तीर्ण केली. वन अधिकारी बनण्याची फक्त औपचारीकताच उरली होती. त्यानंतर दर्शनाच्या घरच्यांनी तिचे लग्न दुसऱ्या मुलासोबत जमवले आणि लग्नाच्या हालचाली सुरु केल्या. त्यामुळे राहुल हांडोरे अस्वस्थ होता. त्याने त्याला एमपीएससीची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी थोडा वेळ द्यावा. तो देखील परीक्षा उत्तीर्ण होऊन अधिकारी बनेल, असे दर्शना आणि तिच्या कुटुंबियांना सांगून पाहिले. मात्र, त्याला प्रतिसाद मिळत नसल्याने राहुलने राजगडाच्या पायथ्याशी दर्शनाची हत्या केली.

### अखेर शोध संपला! दर्शनाच्या मारेकरी राहुल हांडोरेला मुंबईतून अटक

दर्शना पवार हत्या प्रकरणातील संशयित राहुल हांडोरेला मुंबईतून अटक करण्यात आली आहे. राहुल हांडोरे वेगवेगळ्या राज्यात फिरत होता. त्यामुळे पुणे ग्रामीण पोलिसांचे पाच पथकं त्याचा शोध घेत होते. अखेर मुंबईतून पुणे ग्रामीण पोलिसांनी राहुलला ताब्यात घेतलं आहे. पास सुरु असताना राहुलने कबुली दिली नव्हती मात्र, त्यानंतर पोलिसांनी पाच पथकं तपास करत असताना राहुलने हत्या केल्याची कबुली दिली आहे.

## मणिपूरमधील हिंसा ही मानवी शोकांतिका : सोनिया गांधी

✔ सुराज्य/नवी दिल्ली : मणिपूरमधील हिंसा रोखण्यात अपयशी ठरलेल्या मुख्यमंत्री एम. बिरेन सिंह यांच्या विरोधात भाजपच्या आमदारांनी पंतप्रधानांना पत्र लिहिले असतानाच, काँग्रेसच्या संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी यांनी मणिपूरमधील भयानक हिंसा म्हणजे मानवी शोकांतिका असून या घटनेने देशाच्या सदसद्विवेकावर जबर घाव घातला असल्याची खंत व्यक्त केली आहे.



सोनिया गांधी यांनी बुधवारी प्रसिद्ध केलेल्या दोन मिनिटांच्या चित्रफितीमध्ये केंद्र वा राज्य सरकारच्या निष्क्रियतेवर कोणतीही थेट टिप्पणी केलेली नाही. मात्र, मणिपूरमध्ये ३ मे पासून होत असलेल्या हिंसाचारात लोकांचे जीवन उद्ध्वस्त झाल्याचा संदर्भ देत, सोनिया गांधींनी, केंद्र व राज्यातील भाजपच्या सरकारांना अप्रत्यक्ष चपराक दिल्याचे मानले जात आहे.

## अमेरिकेच्या फर्स्ट लेडीला मोदींकडून हिरा भेट

✔ सुराज्य/नवी दिल्ली : भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या तीन दिवसांच्या अमेरिका दौऱ्यावर गेले आहेत. यादरम्यान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन आणि त्यांच्या पत्नी जिल बायडेन यांची भेट घेतली. अध्यक्ष बायडेन आणि फर्स्ट लेडी स्वतः मोदींच्या स्वागतासाठी हजर होत्या. मोदींना त्यांनी स्नेहभोजनासाठी आमंत्रित केलं होतं. व्हाईट हाऊसमध्ये मोदी आणि बायडेन दाम्पत्याने फोटोसेशनही केलं.



या भेटीनंतर नरेंद्र मोदी यांनी एक ट्विट केलं आहे. या ट्विटमध्ये त्यांनी लिहिलं आहे की, 'व्हाईट हाऊसमध्ये स्नेहभोजनासाठी आमंत्रित केल्याबद्दल मी अध्यक्ष जो बायडेन आणि फर्स्ट लेडी जिल बायडेन यांचे आभार मानतो. या भेटीवेळी आम्ही अनेक विषयांवर बातचित केली. दरम्यान व्हाईट हाऊस भेटीवेळी मोदी बायडेन दाम्पत्यासाठी काही भेटवस्तू घेऊन गेले होते. या भेटवस्तूंनी सर्वांचं लक्ष वेधलं आहे.

नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेच्या फर्स्ट लेडी जिल बायडेन यांना ७.५ कॅरेटचा हिरा भेट म्हणून दिला आहे. हा एक ग्रीन डायमंड आहे. तर मोदींनी अध्यक्ष जो बायडेन यांना 'दृष्टिसहस्त्रचंद्रो' ही १० वेगवेगळ्या गोष्टी असलेली चंदनाची पेटी भेट म्हणून दिली आहे. ही भेट अशा व्यक्तीला दिली जाते ज्याने एक हजार पौर्णिमा पाहिल्या आहेत. या पेटीत बायडेन यांच्यासाठी एकूण १० भेटवस्तू ठेवण्यात आल्या आहेत.

## उदयनराजे-शिवेंद्रराजेंच्या वादात फडणवीस यांची शिष्टाई

✔ सुराज्य/मुंबई

खासदार उदयनराजे भोसले आणि आमदार शिवेंद्रराजे भोसले यांच्यातील वाद जगजाहीर आहे. दोघेही सातत्याने एकमेकांना लक्ष्य करत असतात. अनेकदा हे वाद गंभीर असतात. बुधवारी (२१ जून) सकाळीच या दोघांमधल्या वादाचं असंच एक रुप साताऱ्याच्या खिंदवाडी गावात पाहायला मिळालं. एका जमिनीच्या तुकड्यावरून दोन्ही नेते आमने-सामने आले. त्यानंतर दोघांच्या कार्यकर्त्यांमध्ये मोठा वाद झाला. अखेर पोलिसांनी मध्यस्थी करून हा वाद मिटवला. दरम्यान या वादानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोन्ही राजेंची भेट घेतली.




देवेंद्र फडणवीस यांनी उदयनराजे भोसले आणि शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची भेट घेतल्यानंतर प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी फडणवीसांना या भेटीचा तपशील विचारला. तसेच दोन्ही राजेंशी काय चर्चा झाली असा प्रश्न विचारला. यावर उपमुख्यमंत्री म्हणाले, दोघांशीही विविध प्रश्नांवर माझी चर्चा झाली. इथले काही सिंचनाचे प्रश्न आहेत त्यावर चर्चा केली. यासंबंधी त्यांनी मला काही निवेदनं दिली आहेत. तसेच विकासकामांवरही चर्चा झाली.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, 'दोन्ही राजेंना जनतेचे प्रश्न मांडायचे आहेत. मला असं वाटतं की, 'अशा गोष्टी कधीकधी होत असतात. परंतु तिथे काहीतरी गंभीर घडतंय असं काही नाही. किंवा कुठलीही अडचणीची गोष्ट नाही.' देवेंद्र फडणवीस यांनी दोन्ही राजेंबरोबर दोन तास चर्चा केली. त्यानंतर उदयनराजेंबरोबर तासभर चर्चा केली. ही चर्चा केवळ विकासकामांबाबत होती असं फडणवीस यांनी भेटीनंतर स्पष्ट केलं.'

## वृद्ध दाम्पत्याने मृत्यूला कवटाळले

✔ सुराज्य/कोल्हापूर

पन्हाळा तालुक्यातील वेतवडे येथील एका वृद्ध दाम्पत्याने बुधवार (दि. २१) रोजी आजारपणास कंटाळून आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे आपला मृत्यू झाल्यानंतर इतरांना कोणताही त्रास नको यासाठी आत्महत्या करण्यापूर्वी चितेसाठी लागणारे सर्व साहित्य त्यांनी एका शेतात गोळा करून ठेवले. त्यानंतर घरी येऊन त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलले. या घटनेमुळे गावातून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पन्हाळा



तालुक्यातील वेतवडे या गावात महादेव दादु पाटील (वय-७५) व त्यांची पत्नी द्वारकाबाई महादेव पाटील (वय-७०) राहतात. या वृद्ध दाम्पत्याची घरची परिस्थिती बेताचीच होती. दोन मुले, सुना, नातवंडे असा त्यांचा परिवार. मात्र पोटाची खळगी भरण्यासाठी तरुणांनाही लाजवेल अशा पद्धतीने वयाच्या सत्तर-पंचाहत्तरीत दिवसभर शेतात ते राबत असत.

या वृद्ध दाम्पत्याचे काम पाहून सर्व गावकरी आदराने आणि लाडाने त्यांची गरीब व स्वाभिमानी जोडपे अशी प्रशंसा करत. सर्व गावकरी दोघांना आदराने आण्णा, द्वारकाआई असं म्हणत असत. दोन मुले, सुना, नातवंडे असा त्यांचा परिवार होता.

## आषाढी एकादशीला बकरी ईद साजरी न करण्याचा निर्णय

✔ सुराज्य/छत्रपती संभाजीनगर

आषाढी वारीनिमित्त संत तुकाराम महाराज आणि संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींची पालखी पंढरपूरच्या दिशेनं रवाना झाली आहे. टाळ मृदुंगाच्या गजरात आणि भक्तिमय वातावरणात वारकरी पंढरपूरच्या दिशेनं मार्गक्रमण करत आहे. २९ जून रोजी आषाढी एकादशी साजरी केली जाणार आहे. पण याच दिवशी मुस्लीम समुदायाचा पवित्र सण बकरी ईदही आहे. दोन्ही सण एकाच दिवशी आले आहेत. त्यामुळे छ. संभाजीनगर जिल्ह्यातील पंढरपूर येथील नागरिकांनी बकरी ईद साजरी न करण्याचा निर्णय घेतला आहे.



छ. संभाजीनगर जिल्ह्याच्या प्रति पंढरपूर समजल्या जाणाऱ्या पंढरपूर गावातील नागरिकांनी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. बकरी ईद आणि आषाढी एकादशी एकाच दिवशी आली आहे. बकरी ईदच्या दिवशी मुस्लीम बांधव बकरींची कुर्बानी देतात, तर आषाढी वारीला वारकऱ्यांचा उपवास असतो. त्यामुळे हिंदू बांधवांचा अवमान होऊ नये. यासाठी गावकऱ्यांनी बकरी ईद आषाढी वारीच्या दिवशी साजरी करण्याऐवजी दुसऱ्या दिवशी साजरी करण्याचा निर्णय घेतला आहे.

## बँकेतील ११० कोटींवर डल्ला मारण्यापूर्वीच प्लॅन फसला

✔ सुराज्य/छत्रपती संभाजीनगर

देशभरात हिऱ्यांचा व्यवसाय करणाऱ्या एका कंपनीच्या बँक खात्याचे तपशील मिळवून हॅकरच्या मदतीने ११० कोटी रुपये ऑनलाइन ट्रान्सफर करण्याच्या प्रयत्नात असलेल्या टोळीला सायबर पोलिसांनी ताब्यात घेतले. या प्रकरणात सहा जणांना ताब्यात घेण्यात आले आहे. शेख इरफान शेख उस्मान (वय २३, रा. मिटमिटा), वसीम इसाक शेख (वय ३६, रा. पडेगाव), शेख कानित शेख अय्युब (वय १९, रा. रूप महल, एसटी कॉलनी), अब्बास युनूस शेख (वय ३४, मिटमिटा), अमोल साईनाथ करपे (वय २५, रा. कुडापूर झिंझुर्डी, ता. गंगापूर), कृष्णा बाळू करपे (वय २५, रा. कुडापूर झिंझुर्डी, ता. गंगापूर) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. यातील अमोल करपे हा उपसरपंच असल्याची माहितीही सायबर पोलिसांनी दिली.

**काय घडलं?**

सायबर पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक प्रविणा यादव यांनी दिलेल्या माहितीनुसार, हिऱ्यांचा व्यवसाय करणाऱ्या एका कंपनीच्या बँक ऑफ इंडियाच्या कॉर्पोरेट बँक खात्यात उपलब्ध असलेले ११० कोटी रुपये काही जण हॅक करणार असल्याची माहिती मिळाली होती.



य माहितीवरून १७ जूनला दुपारी दीडच्या सुमारास सायबर पोलिसांनी हॉटेल देवप्रिया येथे छापा मारून सहा जणांना ताब्यात घेतले.

यातील इरफान शेखने बँक खात्याची माहिती काढली होती. वसीम इसाक शेख, अमोल साईनाथ करपे, कृष्णा करपे आणि अब्बास शेख हे सर्व जण क्रिप्टो करन्सी विकल्यानंतर हे पैसे आपसात वाटणार होते.

या हॅकर्सच्या टोळीकडे आणखी २० कार्पोरेट बँक खाती असल्याची माहिती समोर आली आहे. टोळीकडून दोन लॅपटॉप, सहा मोबाइल जप्त करण्यात आले. या सहा जणांना कोर्टाने दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. सहायक पोलीस आयुक्त धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रविणा पाटील, सहायक पोलीस निरीक्षक अमोल सातोदकर, पोलीस उपनिरीक्षक राहुल चव्हाण, पोलीस हेडकॉन्स्टेबल संजय साबळे, चंद्रकांत दंडे, रामेश्वर काळे, सुशांत शेळके, वैभव वाघचौरे, अमोल देशमुख, सचिन संपाळ, शाम गायकवाड, गोकुळ कुत्तरवाडे, अमोल सोनटक्के, अभिलाश चौधरी, संदीप पाटील, प्रवीण कुऱ्हाडे यांनी ही कारवाई केली.











# ७०० किलोमीटरचा पायी प्रवास करत शेगावीचे राणा सोलापूर मुक्कामी

- भाविकांकडून उत्साहात स्वागत; दर्शनासाठी दिवसभर रांगा
- आ.प्रणिती शिंदे-मनपा आयुक्तांच्या फुगडीने वेधले लक्ष

सुराज्य/सोलापूर

शेगाव ते सोलापूर हा ७०० किलोमीटरचा प्रवास पायी करत ७५० वारकऱ्यांसह श्री गजानन महाराजांची पालखी गुरूवारी सकाळी सोलापूर शहरात दाखल झाली आहे. टाळ मृदंगांच्या गजरात, फुलांच्या पाकळ्या, रांगोळींने शहरात ठिकठिकाणी शेगावीच्या राणाचे स्वागत स्वागत करण्यात आले. बुधवारी सायंकाळी उत्तर तालुक्यातील उळे येथे पालखीचे आमगन झाले.

रात्रीच्या मुक्कामानंतर सकाळी पालखी हिप्परगा मार्गे शहरात दाखल झाली. वारकरी हातात भगवे झेंडे घेऊन शिस्तबद्ध पद्धतीने शहरात दाखल होत होते. पालखीच्या समोरील भागात टाळकरी तल्लीन होऊन नृत्य करीत होते. सकाळी १० वाजता रूपा भवानी मंदिर चौक येथे पालखीचे आगमन झाले. आ. प्रणिती शिंदे, महापालिका आयुक्त शितल तेली-उगले, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, नगर अभियंता लक्ष्मण चलवादी, काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे, अशोक निंबार्गी शहराध्यक्ष चेतन नरोटे विनोद भोसले माजी नगरसेवक संजय कोळी, राजकुमार पाटील, आदी मान्यवरांनी पालखीचे स्वागत करून दर्शन घेतले. त्यानंतर पालखी पुढे मार्गस्थ झाली. यावेळी आमदार प्रणिती शिंदे आणि महापालिका आयुक्त शितल तेली उगले यांनी तर संदीप कारंजे आणि चेतन नरोटे यांनी फुगडी खेळून सर्वांचा उत्साह वाढवला. पोलीस आयुक्त राजेंद्र माने यांनीही पुष्पहार अर्पण करून पालखीचे स्वागत केले.सोलापुरात आगमन झाल्यानंतर पालखीच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी झाली होती. दुपारी पालखी कुचन प्रशालेत मुक्कामासाठी विसावली. पालखी शुक्रवारी उपलप मंगल कार्यालयात मुक्कामासाठी येणार आहे. शनीवारी पालखी सकाळी दहा वाजता दमाणी नगर येथील सुंदराबाई प्रशालेत येणार असून, दुपारचे भोजन घेऊन पालखी तिऱ्हे मार्गे पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे.

### लवकर पाऊस येऊ दे : आ. शिंदेंनी घातले साकडे

दरवर्षी पालखी ही सोलापूरात येत असते, यंदा मी गजानन महाराजांना सोलापूरवर दुष्काळी परस्थिती आहे, ते संकट दूर होऊ दे. महाराष्ट्रात लवकर पाऊस येऊ दे, सर्व क्षेत्रातील कामगारांची इच्छा पूर्ण होऊ दे. पिकाला पाणी मिळू दे, राज्यांमध्ये स्थिर सरकार येऊ दे अशी मागणी केल्याचे आमदार प्रणिती शिंदे यांनी सांगितले.

### सर्व सोयीसुविधा उपलब्ध केल्या आहेत: आयुक्त

पालखीचा दोन दिवस मुक्काम सोलापुरात आहे. दरम्यानच्या कालावधीतील मार्गावरील साफसफाई, फायर ब्रिगेड, डॉक्टर, ग्राऊंची तयारी इतर काही बारीक सारीक गोष्टींची काळजी घेण्यात आली आहे. वारकऱ्यांसाठी सर्व सोयी उपलब्ध केल्या आहेत, असे सांगत लवकर आम्हाला पाऊस दे अशी मागणी गजानन महाराज व श्री विठ्ठलाकडे केल्याचे आयुक्त शितल तेली-उगले यांनी सांगितले.

# महाआरोग्य शिबिरासाठी प्रत्येकानेच सेवाभाव ठेवून कर्तव्य बजावावे : तानाजीराव सावंत

- महाआरोग्य शिबिराच्या तयारीचा घेतला आढावा
- शिबिरातून वारकरी संप्रदायाचे आरोग्य जपण्याचे काम

सुराज्य/पंढरपूर

वारकरी संप्रदायाचे आरोग्य जपण्याचे काम आषाढी वारी कालावधीत पंढरपूर येथे आयोजित महाआरोग्य शिबिराच्या माध्यमातून होत आहे. त्यामुळे या शिबिरासाठी नियुक्त केलेल्या प्रत्येकानेच सर्वश्रेष्ठ सेवाभावाच्या भावनेने आपले कर्तव्य बजावावे, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रा. ड़ॉ. तानाजी सावंत यांनी आज येथे केले.

आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमिवर वारकरी भाविकांचे आरोग्य जपण्यासाठी आरोग्य विभागातर्फे दि. २७ ते २९ जून दरम्यान पंढरपूर येथे तीन ठिकाणी महाआरोग्य शिबिर आयोजित करण्यात येत आहे. या महाआरोग्य शिबिराच्या नियोजन आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस दूरदृष्यप्रणालीद्वारे आरोग्य विभागाचे अतिरीक्त मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, आयुक्त, आरोग्य सेवा डॉ. धीरजकुमार तर शासकीय विश्रामगृहाच्या सभागृहात प्रभारी जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे, संचालक, आरोग्य सेवा डॉ. स्वप्नील लाळे, नोडल अधिकारी सदाशिव पडदुने, आरोग्य उपसंचालक डॉ. राधाकृष्ण पवार, भैरवनाथ साखर कारखान्याचे अध्यक्ष प्रा. शिवाजी सावंत यांच्यासह जिल्ह्यातील विविध प्रशासकीय अधिकारी, ५ विभागातील आरोग्य उपसंचालक, विविध जिल्ह्यातील जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी आदि उपस्थित होते. आरोग्याची वारी पंढरीच्या दारी'ह्या संकल्पनेवर आधारित वारी कालावधीतील हे महाआरोग्य शिबिर यशस्वी करण्यासाठी शिस्तबद्ध व सूक्ष्म नियोजन करून परस्पर समन्वय ठेवावा. हे महाशिबिर यशस्वी करण्यासाठी आरोग्य विभागासह संबंधित सर्व यंत्रणांनी परिपूर्ण प्रयत्न करावेत, असे निर्देश यावेळी प्रा. ड़ॉ. तानाजी सावंत यांनी दिले. ते म्हणाले, तीन रस्ता, गोपाळपूर, वाखरी या तीन ठिकाणी हे महाशिबिर होणार आहे. यासाठी स्वतंत्र वॉर रूम कार्यान्वित यावी व त्या अनुषंगाने तांत्रिक बार्बीसह आवश्यक सर्व यंत्रणा सुसज्ज ठेवाव्यात. महाशिबिरासाठी नाशिक, कोल्हापूर, पुणेसह विविध आरोग्य मंडळातील अधिकारी, कर्मचारी, सहाय्यक यांच्या सेवा घेण्यात येत आहेत. त्यासाठी शिबिरनिहाय पुरेसे मनुष्यबळ, आवश्यक औषधसाठा व यंत्रसामुग्री, तयार ठेवावी. पालखी प्रस्थान ते पालखी प्रवास या दरम्यान ऑक्सिजन, रक्तसाठा, सुसज्ज १०८ रूग्णवाहिकेसह बाईक अँब्युलन्स सुस्थितीत उपलब्ध ठेवाव्यात. यामध्ये कसलीही तडजोड करू नये, असे त्यांनी स्पष्ट केले. महाशिबिरांच्या ठिकाणी प्रशिक्षित कर्मचाऱ्यांसह अग्निशमन यंत्रणा, फिरते शौचालय, फिजिओथेरपी यंत्रणा आदि सोयी सुविधा उपलब्ध ठेवाव्यात. महावितरणाने शिबिराच्या ठिकाणी सुरक्षित व अखंडित वीजपुरवठा करावा. वारकरी भाविकांसाठी वाळवंटात स्वच्छ व मुबलक पेयजल पुरवठा करावा. महाआरोग्य शिबिरासाठी संबंधित सर्व यंत्रणांनी सोपवलेली जबाबदारी चोखपणे पार पाडावी, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.



**आरोग्य विभागाच्यावतीने केलेल्या तयारीचे सादरीकरण डॉ. राधाकृष्ण पवार यांनी केले. दरम्यान, आरोग्य मंत्री प्रा.डॉ.तानाजी सावंत यांनी महाशिबिरांच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन प्रशासनाने केलेल्या नियोजनाची व सोयीसुविधांची पाहणी केली व संबंधितांना आवश्यक त्या सूचना केल्या.**

## कोणती पालखी, कुठे?

निवृत्तीनाथ महाजारांच्या पालखीनेही सोलापूर जिल्ह्यात प्रवेश केला आहे. रावगाव येथे मुक्काम केल्यानंतर निवृत्तीनाथ महाराजांची पालखी पंढरपूरकडे मार्गस्थ झाली आहे.

संत मुक्ताबाईंची पालखी सध्या उस्मानाबाद जिल्ह्यात आहे. भूम येथील मुक्कामानंतर पालखी पंढरपूरकडे मार्गस्थ झाली असून आज जवळ गावी मुक्कामी असणार आहे.

मुक्काम : संत निवृत्तीनाथांची पालखी सोलापूर जिल्ह्यात दाखल झाली आहे. संत निवृत्तीनाथांची पालखी रावगाव मार्गे करमाळा, खडकेवाडी, कुंभेज फाटा, जेऊरवाडी मार्गे जेऊरला मुक्कामाला पोहचणार आहे. संत निवृत्तीनाथांच्या पालखीने आतापर्यंत ३१९ किलोमीटरचा टप्पा पार केला आहे. तर भूम शहरात मुक्कामी असलेली संत मुक्ताबाईंची दिंडी पायी मार्गाने आष्टा, वांगी बुद्रुक मार्गे जवळा गावात मुक्कामाला जाणार आहे. आतापर्यत मुक्ताईनगरपासून पालखीने तब्बल ३६८ किलोमीटरचा टप्पा पार केला आहे.






**साधू संतांच्या सुंदर आणि बोलक्या चित्रांनी पंढरपूरच्या रस्त्यांवरील भिंतीवर आकर्षक सुंदर झाल्या आहेत. वारीच्या पार्श्वभूमीवर स्वच्छ भारत अभियान आणि माझी वसुंधरा संकल्पनेतून पंढरपूर मध्ये रस्त्यावरील भिंतीवर वेगवेगळ्या साधू संतांचे बोलके चित्र आणि पोट्रेट नगरपालिकेच्या माध्यमातून काढण्यात येत आहे. मुख्याधिकारी अरविंद माळी यांच्या संकल्पनेतून चित्रे रेखाटले आहेत.**

# पंढरपुरातील प्रासादिक दुकाने सजली

सुराज्य/पंढरपूर

आषाढी एकादशीचा सोहळा जवळ येत आहे. अशातच पंढरपुरात आषाढी एकादशीची लगबग सुरू झाली आहे. यामध्येच मंदिर परिसरातील प्रासादिक भांडाराची दुकान आता सजू लागली आहेत. प्रासादिक गोडामालामध्ये पंधरा ते वीस टक्के भाव वाढ कच्च्या मालाची झाली आहे. तरी यंदाच्या वारीत मात्र भाविकांना पूर्वीच्या दरानेच प्रसाद विकत घेता येणार आहे. त्यामुळे वारकरी भक्तांच्या स्वागतासाठी आता पंढरी सजली आहे.

पंढरपुरात आषाढी एकादशीचा सोहळा आणि वारी म्हणजे पंढरपूरकरांच्या उदरनिर्वाहाचे एक साधन असते. वारीतील उलाढालीवर येथील लोकांचा उदरनिर्वाह चालतो. त्यामुळे आषाढी वारीत लोकांची व्यापारावर मोठी भिस्त असते. यासाठी वर्षभर व्यापारी हे आषाढीची वाट पाहतात. आषाढी यात्रा कालावधीत साखर फुटाणा, भत्ता, चुरमुरे, कुंकू, बुक्का अशा प्रासादिक वस्तू त्यांची दुकाने मोठ्या डौलाने सजवली जातात. हीच दुकाने सध्या पंढरपुरात सजली जात आहेत. दहा रुपयांपासून चाळीस रुपयांपर्यंतचा प्रसाद सध्या प्रासादिक दुकानांमध्ये वारकरी भक्तांसाठी उपलब्ध आहे. यामध्ये चुरमुरा आणि बुक्क्याला पंढरपुरात मोठे महत्त्व असते. त्यामुळे अशी दुकाने सर्वाधिक प्रमाणात मंदिर परिसरात आणि पंढरपूर शहरात वेगवेगळ्या ठिकाणी उभारले जातात. अत्यंत सुबक अशी प्रासादिक दुकानांची मांडणी करून वारकरी भक्तांची सेवा पंढरपूरकर करतात. यामध्ये आकर्षक असा प्रसादपुडे यामध्येच विठ्ठलाची मूर्ती अथवा फोटो... कुंकाचे डोंगर... पेढे... हे भाविकांचे लक्ष वेधून घेतात.




आषाढी साठी प्रसादाची दुकाने आता सजवलेली आहे. आता फक्त भाविकांची प्रतीक्षा आहे. साखर फुटाणे बत्तासे , चुरमुरा आणि बुक्का अशा वस्तूंना मोठी मागणी असते. यासाठी सर्व प्रकारचा काच्चा माल भरून आता दुकाने सजवून तयार आहोत.

**- सोहम कुलकर्णी**

# संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यासाठी अकलूजनगरी सज्ज

## नगरपरिषदेची जय्यत तयारी

सुराज्य/अकलूज

**संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यासाठी अकलूज नगरी सज्ज झाली असून वारकऱ्यांना उपयुक्त सोयी सुविधा देण्यासाठी अकलूज नगरपरिषदेने जय्यत तयारी केली असल्याची माहिती अकलूज नगरपरिषदेचे मुख्याधिकारी दयानंद गोरे यांनी दिली.**

शनिवार दि.२४ जून रोजी श्री संत तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा अकलूज मुक्कामी येत आहे. सोहळ्या बरोबर येणाऱ्या वारकऱ्यांच्या स्वागताची व त्यांच्या सोयी सुविधांची अकलूज नगरपरिषदेने तयारी पूर्ण केली असल्याचे सांगून मुख्याधिकारी गोरे म्हणाले, पाणी पुरवठा, रस्ते व बेरेगेटींग, मंडप, दिवाबत्ती व आरोग्य विभागास नेमून दिलेली कामे पूर्ण झाली आहेत. तसेच महिलांसाठी हिरकणी कक्ष देखील उभारण्यात आला आहे. शहरामध्ये वारकऱ्यांकरीता दिंडी मुक्काम ठिकाणी १० टँकरने पाणी पुरवठा करण्यात येणार आहे. ४ ठिकाणी टँकर फिडींगची सोय करण्यात आली आहे. संपूर्ण शहरातील हातपंप व विहीरीमध्ये टी.सी.एल. टाकण्यात आले आहे. पालखी मार्गावर वाहनांची गर्दी होवू नये याकरीता सराटी पूल, समावी याबरोबरच इतर योग्य ठिकाणी बॅरेगेटींग लावून मार्गावरील ६ ठिकाणी वाहनांना प्रवेश बंद करण्यात आला आहे. पालखी मार्गावरील रस्त्यांची दुरूस्ती करण्यात आली असून डांबरीकरण करण्यात आले आहे. पालखी आगमनाच्या ठिकाणी सराटी पूल, गांधी चौक येथे स्वागत कमान उभारण्यात आली आहे. रिंगण सोहळ्याकरीता सदाशिवराव माने विद्यालय येथे लाकडी बॅरेगेटींग व मंडपाची व्यवस्था करण्यात आली आहे.

मुक्कामाचे ठिकाणी आपत्कालीन कक्ष, हिरकणी कक्ष, चौकशी कक्ष व आरोग्य कक्षाची उभारणी करण्यात आली आहे. पालखी मार्गावरील पथदिव्यांची दुरूस्ती करण्यात आली असून धोकादायक वायर व पोलची दुरूस्ती करण्यात आली आहे. पालखी मुक्काम व आवश्यक त्या ठिकाणी १००० शौचालये उभारण्यात आले आहेत. शहरामध्ये जंतुनाशक फवारणी केली असल्याचे मुख्याधिकारी दयानंद गोरे यांनी सांगितले.



### भाविकांसाठी खास एलईडीची सोय

भाविकांना तुकाराम महाराजांचे सुलभ दर्शन व रिंगण सोहळा पाहता यावा याकरीता फिरत्या २ एलईडी व्हॅनची सोय करण्यात आली असून भाविकांना हा पालखी सोहळा 'याची देही, याची डोळा' पाहता येणार आहे.